दैनिक अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक २८९ I रविवार २ ऑगस्ट २०२६

I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

## शेतकऱ्यांना युरोप, चीन अभ्यास दौऱ्याची संधी

**अहिल्यानगर :** शेतकऱ्यांना परदेश अभ्यास दौऱ्याची संधी मिळणार आहे. त्यासाठी २० ऑगस्टपर्यंत तालुका कृषी अधिकाऱ्यांकडे आपले प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे. या दौऱ्यामध्ये पाच शेतकऱ्यांना सहभागी होता येणार आहे. चीन किंवा युरोपला शेतकऱ्यांच्या प्राधान्यानुसार या अभ्यास दौऱ्याचे नियोजन केले जाणार आहे.

शेतकऱ्यांचे केवळ उत्पादन व उत्पादकता वाढविणे हे ध्येय पुढे न राहता उत्पादित होणाऱ्या शेतमालाची दर्जात्मक सुधारणा करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर शेतकऱ्यांनी करणे अत्यंत गरजेचे आहे. शेतीशी निगडित घटकांबाबत जगात वेळोवेळी होत असलेले बदल, विकसित होत असलेले तंत्रज्ञान हे शेतकऱ्यांपर्यंत त्यांच्या गरजेनुरूप योग्य वेळी पोहोचविणे आणि त्यासाठी आवश्यक साहाय्य व सोयीसुविधा पुरविणे निकडीचे आहे.त्यानुसार कृषी विस्तार कार्यक्रमाद्वारे शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देण्याकरिता विविध उपाययोजनांसाठी कृषी विभागाकडून प्रयत्न करण्यात येत आहेत. त्याकरिता या अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये जिल्ह्यास एक महिला शेतकरी, केंद्र किंवा राज्य कृषी पुरस्कार किंवा पीक स्पर्धा विजेता एक शेतकरी व इतर तीन शेतकरी असे एकूण पाच शेतकऱ्यांचा अभ्यास दौऱ्यात समावेश असणार आहे.

## मला चंद्रकांत पाटलांच्या मेंदूवरचे फिंगर प्रिंट बघायचे

हा कसला उच्च तंत्रशिक्षण मंत्री? राज ठाकरेंचा सवाल



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** सध्याच्या काळात नव्या जेन झी पिढीला अपेक्षित असणार्या पद्धतीने विचार करायला पाहिजे. त्यासाठी जुन्या भ्रामक कल्पना सोडून दिल्या पाहिजेत. आमच्या काळात आई सांगायची की, 'डोक्याला रात्री तेल लावत जा, बुद्धी तल्लख होते.' पण एका माणसाने आयुष्यभर केसाला तेल चोपड चोपड चोपडलं, पण त्याला बुद्धी आली नाही. या माणसाचा प्रत्येक केस स्वतंत्र उमेदवारासारखा उभा असतो. अशा शब्दांत मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांना लक्ष्य केले. चंद्रकांत पाटील यांच्यासारखे व्यक्ती आमचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री आहेत. आपण काय बोलतोय, जग कुठे चाललंय, याचा विचार करायला पाहिजे. आपण महाराष्ट्राचे शिक्षण आणि तंत्रज्ञान मंत्री आहोत. पण चंद्रकांत पाटील **(पान ४ वर)**

# धनुष्यबाण आपल्यालाच...

## अन्यथा चिन्ह गोठवेल; उद्धव ठाकरेंचे शिवसैनिकांना निवडणूक तयारीला लागण्याचे आदेश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** गेल्या चार वर्षांपासून सुरू असलेल्या शिवसेना पक्ष आणि चिन्हाच्या सुनावणीसंबंधी उद्धव ठाकरे यांनी हवा करताना सर्वोच्च न्यायालय शिवसेना पक्षचिन्ह आपल्यालाच देणार, आणि जरी चिन्ह आपल्याला मिळालं नाही तर ते गोठवलं जाईल, असा विश्वास व्यक्त केला. सध्याचा काळ हा पक्षवाढीसाठी अनुकूल असून २०२९ च्या निवडणुकीच्या तयारीला लागा, असे आदेश उद्धव ठाकरे यांनी पदाधिकाऱ्यांना दिले.

उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेच्या जिल्हाप्रमुख आणि संपर्कप्रमुखांची बैठक शिवसेना भवनात पार पडली. यावेळी पक्षाच्या पुढील रणनीतीवर चर्चा करण्यात आल्याची माहिती आहे. त्यावेळी उद्धव ठाकरे यांनी पक्ष आणि चिन्हाच्या लढाईत आपलाच विजय होईल असा विश्वास व्यक्त केल्याची माहिती आहे.

आपल्याला चिन्ह मिळालं नाही तर ते गोठवलं जाईल, असा विश्वास उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला. त्यावेळी उद्धव ठाकरे यांनी पदाधिकाऱ्यांना कानपिचक्याही



दिल्या. जबाबदारी पार पाडता येत नसेल तर पद सोडावे, अशा पदाधिकाऱ्यांना अन्य जबाबदारी दिली जाईल, असं उद्धव ठाकरे म्हणाल्याची माहिती आहे.

सध्याचा काळ हा पक्षवाढीसाठी अनुकूल असून पदाधिकाऱ्यांनी २०२९ सालच्या लोकसभा-विधानसभेच्या तयारीला लागा असे आदेश उद्धव ठाकरे यांनी दिले. पक्षबांधणीवर भर देऊन जास्तीत जास्त कार्यकर्ते जोडण्याच्या सूचना ठाकरेंनी दिल्या. आगामी ग्रामपंचायत निवडणुकांवर विशेष लक्ष केंद्रीत करण्याचे निर्देश ठाकरेंनी पदाधिकाऱ्यांना दिले.

### चार ऑगस्टच्या सुनावणीकडे लक्ष

शिवसेना पक्ष आणि या पक्षाचं निवडणूक चिन्ह असलेला धनुष्यबाण कोणाचा, या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. २०२२ साली एकसंध शिवसेनेतून फुटलेल्या एकनाथ यांचा पक्ष हाच खरा शिवसेना पक्ष असल्याच्या आणि त्यांना धनुष्यबाण हे चिन्ह वापरण्यास मुभा देणाऱ्या केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्णयाला उद्धव ठाकरे यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं आहे. आता सर्वोच्च न्यायालयात येत्या ४ ऑगस्ट रोजी याप्रकरणी अंतिम सुनावणी होणार आहे.

दरम्यान, ८ ऑगस्टपर्यंत एसआयआर नोंदणी मोहीम प्रभावीपणे राबवण्यात याव्यात. त्यासाठी आपापल्या विभागात आणि जिल्ह्यात नागरिकांची नोंदणी पूर्ण करण्याचे निर्देश पदाधिकाऱ्यांना देण्यात आले. एसआयआर प्रक्रियेतून एकाही पात्र व्यक्तीचे नाव वगळले जाणार नाही, याची काळजी घेण्याच्या सूचना उद्धव ठाकरेंनी दिल्या.

नीटचा पेपर फुटला म्हणून ज्या मुलांनी आत्महत्या केली त्यांची सरकारने माफी मागितली पाहिजे. ज्या विद्यार्थ्यांवर ही वेळ आली, त्यांच्यावर लाठीचार्ज करण्यात आला, त्यांचीही सरकारने माफी मागितली पाहिजे असं उद्धव ठाकरे म्हणाले.

### अँटिलिया स्फोटक, मनसुख हिरेन हत्या प्रकरण

## सचिन वाझे, प्रदीप शर्मांसह १० आरोपींवर आरोप निश्चित

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या 'अँटिलिया' निवासस्थानाबाहेर स्फोटकांनी भरलेली गाडी सापडल्याच्या आणि उद्योगपती मनसुख हिरेन यांच्या हत्येच्या बहुचर्चित प्रकरणात मुंबईतील विशेष एनआयए न्यायालयाने मोठा निर्णय दिला आहे. बडतर्फ पोलीस अधिकारी सचिन वाझे आणि माजी एन्काउंटर स्पेशालिस्ट प्रदीप शर्मा यांच्यासह एकूण १० आरोपींविरोधात अखेर ५ वर्षांनंतर आरोप निश्चित करण्यात आले आहेत.

आरोप निश्चिती झाल्यामुळे या हायप्रोफाइल प्रकरणाच्या प्रत्यक्ष



सुनावणीचा आणि खटल्याचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. सर्व आरोपींविरुद्ध बेकायदेशीर कृत्य प्रतिबंधक कायदा आणि भारतीय दंड संहितेच्या विविध गंभीर कलमांखाली खटला चालवला जाणार आहे. २५ फेब्रुवारी २०२१ रोजी दक्षिण मुंबईतील मुकेश अंबानी यांच्या 'अँटिलिया' या निवासस्थानाबाहेर बेवारस सोडलेली एक संशयित स्कॉर्पिओ गाडी आढळून आली होती.

या गाडीत जिलेटिनच्या २० कांड्या आणि धमकीचे पत्र सापडले होते, ज्यामुळे संपूर्ण देशात खळबळ उडाली होती. त्यानंतर अवघ्या काही दिवसांत, म्हणजेच ५ मार्च २०२१ रोजी या गाडीचे मालक मनसुख हिरेन यांचा मृतदेह मुंब्रा येथील खाडीत रहस्यमय परिस्थितीत आढळून आला. मनसुख हिरेन यांची हत्या सचिन वाझे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनीच केल्याचा गंभीर आरोप हिरेन यांच्या कुटुंबीयांनी केला होता.सुरुवातीला या प्रकरणाचा तपास महाराष्ट्र एटीएसकडे होता, मात्र घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन केंद्रीय गृह मंत्रालयाने हा तपास राष्ट्रीय तपास यंत्रणेकडे सोपवला. तपासादरम्यान एनआयएने कारवाई करत खालील आरोपींना अटक केली.

### महत्त्वाचे..

#### राष्ट्रकुल स्पर्धेत भारताला दुहेरी सुवर्ण!



नवी दिल्ली : भारताच्या १० बॉक्सिंगपटूंनी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये आपापल्या गटाच्या अंतिम फेरीत प्रवेश करून पदक पक्के केले. स्पर्धेत शनिवारी भारतीय बॉक्सर नेमकी किती सुवर्णपदकं जिंकतील याची उत्सुकता होती आणि प्रीती पवार व जैस्मिन यांनी सुवर्ण जिंकून सुरूवात दणक्यात केली.महिलांच्या ५४ किलो वजनी गटाच्या अंतिम सामन्यात प्रीती पवारने कॅनडाच्या एस. एस. डेलगाडोचा ५-० अशा एकमताने पराभव करत सुवर्णपदकावर नाव कोरले. सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करत प्रीतीने प्रतिस्पर्धीला कोणतीही संधी दिली नाही.महिलांच्या ५७ किलो वजनी गटात जैस्मिननेही तितकीच दमदार कामगिरी केली. उत्तर आयर्लंडच्या चार वेळा राष्ट्रकुल पदकविजेत्या मायकेला वॉल्शवर ५-० अशा दणदणीत विजयासह तिने सुवर्णपदक पटकावले. अनुभवी प्रतिस्पर्धीविरुद्ध जैस्मिनने दाखवलेला आत्मविश्वास आणि अचूक पंच सर्वांचे लक्ष वेधून घेणारे ठरले.

### समता पतसंस्थेतील बनावट खात्यांचा तपास...

# भोंदू अशोक खरातला सात दिवस पोलीस कोठडी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**शिर्डी :** समता नागरी सहकारी पतसंस्थेच्या राहाता शहरातील शाखेत बोगस खाती उघडून आर्थिक व्यवहार केल्याप्रकरणी दाखल असलेल्या गुन्ह्यात आरोपी भोंदू अशोक खरात याला शिर्डी पोलिसांनी अटक केली. त्याला शनिवारी न्यायालयाने ७ ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी सुनावल्याची माहिती 'एसआयटी'चे तपास अधिकारी तथा शिर्डी उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती यांनी दिली.

अशोक खरात नाशिक कारागृहात न्यायालयीन कोठडीत होता. दिनेश परब यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार राहाता पोलीसांनी अशोक खरातविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केलेला आहे. समता पतसंस्थेच्या राहाता शाखेत १०० बनावट खात्यांच्या गाजलेल्या आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात मुख्य आरोपी अशोक खरात याला नाशिक 'एसआयटी'ने पुन्हा काल शुक्रवारी रात्री शिर्डी पोलिसांच्या स्वाधीन केले.

यापूर्वी शिर्डीतील जमीन खरेदी प्रकरणात झालेल्या चौकशीत अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या होत्या. राहाता येथील समता पतसंस्थेत ५७ व्यक्तींच्या नावावर १०० बनावट खाती उघडण्यात आली होती. विशेष म्हणजे या सर्व खात्यांमध्ये अशोक खरात याचेच नाव वारसदार म्हणून नोंदविण्यात आले होते. या खात्यांमधून कोट्यवधी रुपयांची आर्थिक उलाढाल झाल्याचा संशय तपास यंत्रणेला आहे. शिर्डी पोलिसांनी संबंधित खातेदारांची **(पान ४ वर)**

## पंतप्रधान मोदींविषयी अपशब्द : १५ वर्षीय विद्यार्थिनीची जाहीर माफी



**नवी दिल्ली :** जंतर-मंतरवरील आंदोलनादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबाबत अपशब्द वापरल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर संबंधित १५ वर्षीय विद्यार्थिनीने हात जोडून देशाची जाहीर माफी मागितली आहे.

इन्स्टाग्रामवर प्रसिद्ध केलेल्या व्हिडिओत तिने, मी मित्रांसोबत कॅनॉट प्लेस येथे फिरण्यासाठी गेले होते. तेथे उपस्थित लोकांच्या बोलण्याच्या प्रभावाखाली येऊन मी जे काही बोलले, ते अक्षम्य होते. ही माझी पहिली आणि शेवटची चूक असून म ला माझ्या कृत्याची लाज वाटते, असे म्हटले आहे.

या घटनेनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आंदोलनातील विद्यार्थ्यांकडून झालेल्या शिवीगाळीचा व्हिडिओ शेअर करत प्रतिक्रिया दिली होती. त्यांनी दिवंगत आईबाबत वापरलेल्या शब्दांमुळे मनाला वेदना झाल्याचे नमूद केले. मात्र, तरुणांना त्यांच्या चुका सुधारण्याची संधी मिळाली पाहिजे आणि त्यांनी त्यांना माफ केल्याचेही स्पष्ट केले.

दरम्यान, संबंधित विद्यार्थिनी नोएडामध्ये आईसोबत राहत असून आंदोलनानंतर कुटुंबीय घरी परतलेले नसल्याची माहिती समोर**(पान ४ वर)**

### ईमेल हॅक करून उद्योजकाची १३ लाख ५६ हजारांची फसवणूक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शहरातील सावेडी परिसरातील व्यावसायिक संदीप काशिनाथ मोरे यांची तब्बल १३ लाख ५६ हजार ९५७ रुपयांची ऑनलाईन फसवणूक झाल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. अनोळखी भामट्याने मोरे यांच्या कंपनीचा संगणकीय पत्ता (ईमेल) हॅक करून बनावट व्यवहार करत ही मोठी रक्कम स्वतःच्या खात्यात वळवून घेतली.

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, संदीप मोरे ( रा. श्रीकृष्ण नगर, सावेडी, अहिल्यानगर) यांची पॉलिथर्म नावाची कंपनी आहे. त्यांच्या कंपनीचा अधिकृत ईमेल आयडी भामट्याने हॅक केला. त्यानंतर आरोपीने कंपनीचे हुबेहूब बनावट लेटरहेड आणि बँक तपशील बदलून बनावट धनादेश तयार केला.हा बनावट तपशील मोरे यांच्या 'सीजी पॉवर अँड सोल्यूशन्स' या ग्राहक कंपनीला ईमेलद्वारे पाठवण्यात आला. ग्राहक कंपनीने मोरे यांच्या कंपनीला द्यायचे असलेले पैसे या नवीन बँक खात्यावर भरले. दि. ९ जुलै रोजी ६,९३,२२३ रुपये आणि २१ जुलै रोजी ६,६३,७३४ रुपये अशी एकूण १३,५६,९५७ रुपयांची रक्कम ट्रान्सफर करण्यात आली. मात्र ही रक्कम मोरे यांच्या मूळ बँक खात्यात जमा न होता कॅनरा बँकेच्या भामट्याच्या खात्यावर जमा झाली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच संदीप मोरे यांनी अहिल्यानगर सायबर पोलीस ठाण्यात धाव घेतली. **(पान ४ वर)**

## दूध भेसळीत माझा संबंध सिद्ध करा

### लावता राजकारणातून निवृत्त होईन : दिलीप वळसे पाटील

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मंचर :** राज्यातील दूध भेसळ प्रकरणावरून सुरू असलेल्या राजकीय आरोप-प्रत्यारोपांच्या पार्श्वभूमीवर आंबेगावचे आमदार तथा माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी विरोधकांना थेट खुले आव्हान दिले आहे. दूध भेसळ किंवा कोणत्याही बेकायदेशीर प्रकरणात माझा दूरान्वयानेही संबंध असल्याचे सिद्ध झाले, तर एका मिनिटाचाही विलंब न लावता सार्वजनिक जीवनातून कायमची निवृत्ती घेईन, अशी ठाम घोषणा त्यांनी केली.



■ मी आयुष्यभर स्वच्छ, पारदर्शक आणि जनतेच्या विश्वासावर आधारित राजकारण केले आहे. सत्य जनतेसमोर येईल आणि सत्याचाच विजय होईल. नागरिक, समाजमाध्यमे आणि प्रसारमाध्यमांनी वस्तुस्थितीची दखल घ्यावी.-**दिलीप वळसे पाटील, माजी गृहमंत्री**

शनिवारी (१ ऑगस्ट) व्हिडिओ संदेशाद्वारे जनतेशी संवाद साधताना वळसे पाटील म्हणाले की, राज्यात अन्न व औषध प्रशासन (एफडीए) दूध व्यवसायाशी संबंधित ठिकाणी कायद्यानुसार तपासणी व कारवाई करत असून, त्या कारवाईला आपला पूर्ण पाठिंबा आहे. मात्र, या कारवाईचा आधार घेत काही विरोधक जाणीवपूर्वक आपले नाव या प्रकरणाशी जोडून राजकीय प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप त्यांनी केला.भेसळ करणारी व्यक्ती, संस्था किंवा कंपनी कोणतीही असो, अशा कोणाच्याही पाठीशी आपण कधीही उभे राहणार नसल्याचे स्पष्ट करत त्यांनी एफडीए आणि पोलीस प्रशासन दोषींवर कठोर कारवाई करण्यास सक्षम असल्याचे सांगितले. कायद्यापुढे सर्व समान आहेत, असेही त्यांनी ठामपणे नमूद केले. विरोधकांकडून खोटे व बिनबुडाचे आरोप करून राजकीय षड्यंत्र रचले जात असल्याचा आरोप करत वळसे पाटील यांनी इशारा दिला की, बदनामीचे हे प्रकार तातडीने थांबवले नाहीत तर संबंधितांविरोधात उच्च न्यायालयात फौजदारी गुन्हा दाखल करण्याबरोबरच मोठ्या आर्थिक अब्रूनुकसानीचा दावाही दाखल करण्यात येईल.

# कर्जमाफी नव्हे तर शेतकऱ्यांच्या गळ्यात 'ओटीएस'चा फास!

## रविकांत तुपकरांचा गंभीर आरोप, ९ ऑगस्टनंतर महाराष्ट्रात राज्यव्यापी आंदोलन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोल्हापूर :** राज्यातील शेतकरी चळवळीतील आक्रमक नेतृत्व असलेले क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रविकांत तुपकर यांनी शनिवारी कोल्हापुरात बोलताना पुन्हा एकदा सरकारवर जोरदार हल्लाबोल करत नव्या राज्यव्यापी आंदोलनाचे रणशिंग फुंकले आहे.

यापूर्वी कर्जमाफी, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रोत्साहन अनुदान, शेतमालाचे प्रश्न आणि विविध आंदोलनांनी राज्य सरकारला घेरणारे तुपकर सध्या पश्चिम महाराष्ट्र दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात कोल्हापूर येथे पत्रकार परिषदेत त्यांनी सरकारच्या अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी



योजनेवर गंभीर प्रश्न उपस्थित करत, ही कर्जमाफी नसून तडजोडीची ओटीएस स्कीम ( एकरकमी परतफेड) आहे. राज्य सरकारने शेतकऱ्यांचा विश्वासघात केला आहे, असा घणाघात केला.

पत्रकारांशी बोलताना तुपकर म्हणाले, सरकारने दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी करण्याची घोषणा केली होती. मात्र प्रत्यक्षात सरकारने 'वन टाईम सेटलमेंट' (ओटीएस) चा मार्ग स्वीकारला आहे. या पद्धतीत सरकार फक्त मुद्दल भरणार असून व्याज बँकांनी 'राईट ऑफ' करावे, अशी भूमिका घेतली आहे. पण या निर्णयाचा सर्वात मोठा फटका तब्बल ५६ लाख शेतकऱ्यांना बसणार असून त्यांच्या सिबिल स्कोअरवर कायमचा डाग बसू शकतो, असा गंभीर आरोप त्यांनी केला.

उद्या एखाद्या शेतकऱ्याला पीककर्जाव्यतिरिक्त गृहकर्ज, शिक्षण कर्ज किंवा व्यवसायासाठी कर्ज घ्यायचे असेल, तर खराब सिबिलमुळे बँका त्याला दारातही उभे करणार नाहीत. त्या भविष्यातील आर्थिक उद्ध्वस्ततेची जबाबदारी सरकार घेणार का? मुख्यमंत्री आणि कृषिमंत्री या प्रश्नावर बोलायलाही तयार नाहीत, अशी टीकाही त्यांनी केली.

सध्या बँकिंगचे नियम अत्यंत कठोर झाले आहेत. सिबिल खराब असेल तर कर्ज मिळत नाही. अशा परिस्थितीत सरकार एका बाजूला कर्जमाफीची जाहिरात करून स्वतःची पाठ थोपटत आहे आणि दुसऱ्या बाजूला लाखो शेतकऱ्यांचे आर्थिक भविष्य अंधारात ढकलत आहे, असे तुपकर म्हणाले. रिझर्व्ह बँकेशी बोला, नियम बदला, पण महाराष्ट्रातील एकाही शेतकऱ्याचे सिबिल खराब होता कामा नये, अशी ठाम मागणी त्यांनी केली.

सरकारने दोन लाखांची कर्जमाफी जाहीर केली होती, मग ओटीएसची गरज काय होती, असा सवाल करत तुपकर म्हणाले की, अशा योजना तर बँका वसूल न होणाऱ्या कर्जासाठी आणतात. मग सरकारने कर्जमाफीच्या नावाखाली नेमके वेगळे **(पान ४ वर)**

### राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा

राज्य सरकारने या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेतला नाही, तर ९ ऑगस्ट क्रांतीदिनानंतर राज्यभर अभूतपूर्व आंदोलन उभारले जाईल, असा इशारा देताना तुपकर म्हणाले, आम्ही ओटीएससाठी आंदोलन केले नव्हते. आमचा लढा सरसकट कर्जमुक्तीसाठी होता. सरकारने आंदोलकांचा आणि शेतकऱ्यांचा विश्वासघात केला आहे.

### बोगस बियाण्यांवर संताप

बोगस बियाणे, खते आणि औषधांच्या प्रश्नावरही रविकांत तुपकर यांनी संताप व्यक्त केला. मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, तेलंगणा, कर्नाटकमधील काही कंपन्या आणि कृषी विभागातील अधिकाऱ्यांचे साटेलोटे असल्याचा गंभीर आरोप करत, दोषी कंपन्यांना केवळ ५०० रुपयांचा दंड ही शेतकऱ्यांची थट्टा असल्याचे ते म्हणाले. अशा कंपन्यांवर कठोर कारवाई करून सीड ॲक्ट मध्ये बदल करावा, अशी मागणी त्यांनी केली.र

# श्रेयवाद नको... गुंतवणूकदारांचा पैसा परत द्या !

अहिल्यानगर जिल्ह्यातील सिस्पे आणि इन्फिनाईट बिकन आर्थिक घोटाळ्याचा विषय पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. यावेळी कारण आहे फिजी देशातून एका आरोपीचे प्रत्यार्पण. आर्थिक गुन्हे शाखेने आरोपी राहुल काळोखे याला भारतात आणण्यात यश मिळवले आणि त्यानंतर राजकीय श्रेयवादाची स्पर्धाच सुरू झाली. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सरकारच्या प्रयत्नांचा उल्लेख केला, तर खासदार नीलेश लंके यांनी दिल्लीपासून दुबईपर्यंत केलेल्या पाठपुराव्यामुळे ही कारवाई शक्य झाल्याचा दावा केला. समाजमाध्यमांवर समर्थकांनी एकमेकांविरुद्ध मोहीम उघडली. मात्र या सर्व गदारोळात सर्वात महत्त्वाचा प्रश्न मागे पडला आहे की, ज्यांची आयुष्यभराची कमाई लुटली गेली, त्या हजारो गुंतवणूकदारांचे पैसे परत कधी मिळणार?




राजकारणात श्रेय घेण्याची परंपरा नवी नाही. एखादा रस्ता झाला, एखादा प्रकल्प आला, एखादा गुन्हेगार पकडला गेला की त्याचे राजकीय भांडवल करण्याचा प्रयत्न होतो. परंतु आर्थिक घोटाळ्यासारख्या संवेदनशील प्रकरणातही श्रेयवाद सुरू होणे हे दुर्दैवी आहे. कारण येथे विषय एखाद्या व्यक्तीचा नाही, तर हजारो कुटुंबांच्या उद्ध्वस्त झालेल्या आर्थिक भविष्याचा आहे.

सिस्पे आणि इन्फिनाईट बिकनसारख्या कंपन्यांनी अधिक परताव्याचे आमिष दाखवून सामान्य नागरिकांना जाळ्यात ओढले. शेतकरी, शिक्षक, निवृत्त कर्मचारी, छोटे व्यापारी, मजूर अशा अनेकांनी आपल्या आयुष्याची साठवण या कंपन्यांकडे सोपवली. कोणी मुलांच्या शिक्षणासाठी ठेवलेले पैसे गुंतवले, कोणी मुलीच्या लग्नासाठी, तर कोणी वृद्धापकाळाच्या आधारासाठी. परंतु काही दिवसांतच ही स्वप्ने उद्ध्वस्त झाली. आजही हजारो कुटुंबे आर्थिक आणि मानसिक संकटातून जात आहेत.

एका आरोपीला परदेशातून भारतात आणणे ही निश्चितच तपास यंत्रणांची महत्त्वाची कामगिरी आहे. त्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांचे कौतुक झालेच पाहिजे. मात्र वस्तुस्थिती अशी आहे की हा घोटाळ्याचा प्रमुख सूत्रधार नाही. अनेक मुख्य आरोपी अजूनही परदेशात असल्याचा संशय आहे. त्यांच्याविरोधात रेड कॉर्नर नोटीस जारी झाली असली तरी ते अजून कायद्याच्या कचाट्यात आलेले नाहीत. त्यामुळे एका आरोपीच्या अटकेवर विजयाचा जल्लोष करणे आणि त्याचे राजकीय श्रेय घेणे योग्य ठरणार नाही.

या घोटाळ्यात जिल्ह्यातील कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाली आहे. अनेक गुन्हे दाखल झाले, शेकडो आरोपींवर कारवाई सुरू आहे, मालमत्ता जप्त करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. पण गुंतवणूकदारांच्या खात्यात एक रुपयाही परत आलेला नाही. त्यामुळे सामान्य नागरिकांच्या दृष्टीने खरी बातमी आरोपी पकडला ही नाही, तर ''माझे पैसे मला परत मिळाले'' ही आहे.

दुर्दैवाची बाब म्हणजे सिस्पे हा काही पहिला किंवा शेवटचा आर्थिक घोटाळा नाही. अहिल्यानगरसारख्या ग्रामीण जिल्ह्यातही गेल्या काही वर्षांत अशा अनेक फसवणुका उघडकीस आल्या. शेवगाव-पाथर्डी परिसरातील कथित शेअर बाजार घोटाळा, विविध पतसंस्थांमधील गैरव्यवहार, बोगस गुंतवणूक योजना, मल्टी लेव्हल मार्केटिंगच्या नावाखाली झालेली लूट अशा अनेक प्रकारांनी सामान्य माणसाची कष्टाची कमाई लुबाडली गेली. महाराष्ट्रातच नव्हे तर देशभरात अशा घोटाळ्यांची साखळी सुरूच आहे.

यामागे केवळ काही भामटे जबाबदार नाहीत. प्रशासकीय दिरंगाई, तपासातील विलंब, न्यायालयीन प्रक्रिया आणि राजकीय हस्तक्षेप यामुळे अशा घोटाळेबाजांचे धैर्य वाढते. अनेक वेळा तक्रारी असूनही वेळीच कारवाई होत नाही. आरोपींना देशाबाहेर पळून जाण्याची संधी मिळते. तोपर्यंत हजारो गुंतवणूकदारांचे आयुष्य उद्ध्वस्त झालेले असते.

या प्रकरणातून आणखी एक गंभीर प्रश्न पुढे येतो. आर्थिक गुन्ह्यांचा आणि राजकीय क्षेत्राचा संबंध. अनेक एजंट आणि संबंधित व्यक्ती विविध राजकीय पक्षांशी जोडलेल्या असल्याच्या चर्चा वेळोवेळी समोर आल्या. निवडणुकांमध्येही हा मुद्दा गाजला. त्यामुळेच जनतेच्या मनात संशय निर्माण होतो. आर्थिक गुन्ह्यांमध्ये कोणाचाही राजकीय रंग न पाहता कठोर आणि निष्पक्ष कारवाई झाली पाहिजे. अन्यथा न्यायव्यवस्थेवरील विश्वास ढासळतो.

आज विखे पाटील असोत किंवा नीलेश लंके असोत, त्यांनी आरोपी पकडण्यासाठी प्रयत्न केले असतील तर त्याचे स्वागतच आहे. लोकप्रतिनिधींनी जनतेच्या प्रश्नांसाठी पाठपुरावा करावाच. परंतु तो केवळ पत्रकार परिषदांपुरता, प्रसिद्धीपत्रकांपुरता किंवा समाजमाध्यमांवरील श्रेयवादापुरता मर्यादित राहता कामा नये. त्याच ताकदीने आता गुंतवणूकदारांना त्यांचे पैसे परत मिळवून देण्यासाठीही प्रयत्न झाले पाहिजेत. जप्त मालमत्तेचा लिलाव, न्यायालयीन प्रक्रिया गतीमान करणे, परदेशात लपलेल्या मुख्य सूत्रधारांना भारतात आणणे आणि पीडितांना न्याय मिळवून देणे यासाठी सर्वपक्षीय इच्छाशक्ती दिसली पाहिजे.

कारण शेवटी सामान्य माणसाला कोण श्रेय घेत आहे, याच्याशी काहीही देणेघेणे नाही. त्याला राजकीय वादात रस नाही. त्याला फक्त आपल्या आयुष्याची कमाई परत हवी आहे. ज्यासाठी त्याने घाम गाळला, कुटुंबाच्या गरजा कमी केल्या, भविष्याची स्वप्ने पाहिली, ती रक्कम पुन्हा त्याच्या हाती आली तरच या संपूर्ण कारवाईला अर्थ आहे. आरोपी पकडणे ही सुरुवात आहे; न्याय मिळणे हा शेवट आहे. तोपर्यंत कोणत्याही राजकीय पक्षाने विजयाचा जल्लोष करू नये. श्रेयाच्या राजकारणापेक्षा जनतेच्या पैशांचा प्रश्न मोठा आहे. त्यामुळे आजची खरी मागणी एकच आहे की, श्रेयवाद थांबवा... आणि हजारो गुंतवणूकदारांचे कष्टाचे पैसे परत द्या..!

# वाहतूक कोंडीत अडकलेल्या नागरिकांना संजीवनी युवा प्रतिष्ठानचा मदतीचा हात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** सतत सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे नगर-मनमाड महामार्गावरील येवला-कोपरगाव मार्गावर आंचलगाव पाटीजवळ कंटेनर, ट्रक आणि पिकअप वाहनाचा भीषण तिहेरी अपघात झाला. या अपघातामुळे महामार्गावरील दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागून वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली होती.

या अपघातामुळे अनेक प्रवासी, महिला, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच अत्यावश्यक सेवांतील वाहने तासन्तास वाहतूक कोंडीत अडकून पडली. संततधार पावसामुळे नागरिकांचे मोठे हाल होत असताना आंचलगाव ते कोपरगाव परिसरातील परिस्थिती अत्यंत गंभीर बनली होती.

घटनामागील गांभीर्य लक्षात घेताच आमदार विवेकभैय्या कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या युवा सेवकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. वाहतूक कोंडीत अडकलेल्या नागरिकांना पिण्याचे स्वच्छ पाणी, चहा, बिस्किटे व नाश्त्याचे वाटप करण्यात आले. दीर्घकाळ वाहनांमध्ये अडकलेल्या प्रवाशांना दिलासा देण्याबरोबरच त्यांची आवश्यक ती विचारपूस करून



शक्य ती सर्व मदत करण्यात आली.

परिस्थितीची गांभीर्य लक्षात घेऊन आ. विवेक कोल्हे यांनी कोपरगाव व येवला पोलिस प्रशासनाशी संपर्क साधून वाहतूक सुरळीत करण्याबाबत चर्चा केली. तसेच, नॅशनल हायवेच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून नगर-मनमाड महामार्गाच्या दुहेरी मार्गाचे चौपदरीकरण करण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाहीचा प्रस्ताव तयार करून त्यावर तातडीने अंमलबजावणी करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

महामार्गावरील वाहतूक सुरळीत करण्यासाठी युवा सेवकांनी पोलिस प्रशासनाशी उत्तम समन्वय साधत वाहने योग्य दिशेने मार्गस्थ करण्यासाठी अथक परिश्रम घेतले. भर पावसातही कशाचीही तमा न बाळगता सेवाभावाने काम करणाऱ्या युवा सेवकांच्या या तत्पर सामाजिक कार्याचे नागरिकांनी मनापासून कौतुक केले. ''संकटाच्या काळात समाजाच्या मदतीसाठी तत्परतेने धावून जाणे, गरजूंच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे आणि मानवतेची सेवा करणे हीच संजीवनी युवा प्रतिष्ठानची खरी ओळख आहे.आपत्तीच्या काळात नागरिकांना दिलासा देण्यासाठी सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे अनेक अडकलेल्या प्रवाशांना मोठा आधार मिळाला असून, सर्व स्तरातून या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त होत आहे.

# विराट सामाजिक प्रतिष्ठानतर्फे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : लेखक, कवी, समाजसुधारक तथा लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त विराट सामाजिक प्रतिष्ठान, महाराष्ट्र राज्य व आमदार विठ्ठलराव लंघे पाटील मित्र मंडळाच्या संयुक्त विद्यमाने नेवासा येथे अभिवादन कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमास नगराध्यक्ष डॉ. करणसिंह भाऊसाहेब घुले पाटील प्रमुख उपस्थित होते. नेवासा नगरपंचायत चौकातील अण्णाभाऊ साठे यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मान्यवरांनी अभिवादन केले. यावेळी नगराध्यक्ष डॉ. घुले यांनी अण्णाभाऊ साठे यांनी श्रमजीवी, कष्टकरी, शोषित आणि वंचित समाजासाठी उभारलेला लढा प्रेरणादायी असल्याचे सांगत त्यांच्या साहित्य व विचारांचा गौरव केला. कार्यक्रमात नेवासा मार्केट कमिटीचे सभापती नंदकुमार पाटील, सामाजिक कार्यकर्ते रामभाऊ केंदळे, नगरसेवक प्रवीण सरोदे, रमेशलाल ओस्तवाल यांच्यासह मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक विकास चव्हाण यांनी तर आभार नगरसेवक प्रवीण सरोदे यांनी मानले. यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढील वर्षापासून विद्यार्थ्यांसाठी स्पर्धात्मक उपक्रम राबवून अण्णाभाऊ साठे यांचे विचार अधिक व्यापकपणे समाजापर्यंत पोहोचविण्याचा निर्धार आयोजकांनी व्यक्त केला.

# शिर्डीचे पोलीस निरीक्षक रणजीत गलांडे यांना मिळेना विश्रांती

**अशोक दुशिंग । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** अहोरात्र जनतेच्या सुरक्षेसाठी तैनात असणाऱ्या पोलीस दलातील अधिकाऱ्यांवर कामाचा ताण किती प्रचंड असतो, याचे एक जिवंत उदाहरण सध्या शिर्डीत पाहायला मिळत आहे. शिर्डी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रणजीत गलांडे यांना सध्या वाढत्या कामाच्या व्यापामुळे पुरेशी विश्रांती आणि झोपही मिळेनाशी झाली आहे. कर्तव्य निभावताना वाढलेल्या प्रचंड तणावामुळे अखेर त्यांच्यावर ''झोप देता का झोप?'' असे म्हणण्याची वेळ शिर्डी परिसरात रंगली आहे.

दीड वर्षात गुन्हेगारीविरुद्ध २४ तास धडक मोहीम पोलीस निरीक्षक रणजीत गलांडे यांनी गेल्या दीड वर्षाच्या कार्यकाळात शिर्डी शहरातील गुन्हेगारी समूळ नष्ट करण्यासाठी २४ तास अहोरात्र काम केले आहे. शिर्डी तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी चालणारे अवैध व्यवसाय, वेश्या व्यवसाय आणि पाकीटमारी यांसारख्या गंभीर गुन्ह्यांवर त्यांनी कडक कायदेशीर कारवाईचा बडगा उगारला. तीर्थक्षेत्र शिर्डीला एका सुरक्षित आणि गुन्हेगारीमुक्त दिशेने नेण्यासाठी त्यांनी मोठा प्रामाणिक प्रयत्न केला असून, त्यांच्या या धडक मोहिमांमुळे गुन्हेगारांचे'' झिरो'' मेंटेनन्स आहेत. रणजीत गलांडे यांच्या



या कर्तव्यदक्षतेवर राज्याचे जलसंधारण मंत्री नामदार राधाकृष्ण विखे आणि डॉ. सुजय विखे यांनी मोठा विश्वास दाखवला होता. त्यांनी गलांडे यांच्या खांद्यावर शिर्डीची महत्त्वाची जबाबदारी सोपवली होती. गलांडे यांनी देखील हा विश्वास सार्थ ठरवत, अत्यंत बिकट परिस्थितीतही ही जबाबदारी समर्थपणे पेलून दाखवली आहे. शिर्डी हे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे तीर्थक्षेत्र असल्याने या ठिकाणी दररोज देशभरातून हजारो-लाखो भाविक दर्शनासाठी येतात. यात अनेक अतिमहत्त्वाच्या व्यक्तींचा देखील समावेश असतो. या भाविकांची सुरक्षा, शिर्डी शहरातील कायदा व सुव्यवस्था राखणे आणि वाहतूक कोंडीवर नियंत्रण मिळवणे हे पोलिसांसमोर दररोज मोठे आव्हान असते. गुन्हेगारीचे प्रमाण कमी करण्यासाठी आणि प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी गलांडे स्वतः रात्री-अपरात्री गस्त घालण्यासोबतच तपासाची चक्रे फिरवत असतात. या उल्लेखनीय, सातत्यपूर्ण आणि २४ तास सुरू असणाऱ्या कामगिरीमुळे साहजिकच त्यांच्यावर कामाचा ताण आणि जबाबदारी प्रचंड वाढली आहे. आरोग्याचा प्रश्न आणि विश्रांतीची गरज सततच्या बैठका, तपास आणि बंदोबस्त यांमुळे त्यांना सलग काही तास शांत झोप घेणेही कठीण झाले आहे. याच थकव्यामधून आणि वाढत्या मानसिक ताणामधून ''झोप देता का झोप?'' अशी भावना त्यांच्याकडून व्यक्त झाल्याचे बोलले जात आहे. रणजीत गलांडे यांच्यासारखा कर्तव्यदक्ष अधिकारी अहोरात्र राबत असताना, त्यांना आणि त्यांच्या सहकाऱ्यांना पुरेशी विश्रांती मिळणेही तितकेच गरजेचे आहे, सूर सध्या शिर्डीकरांमधून उमटत आहे.

# आण्णाभाऊ साठे जयंती साजरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** येथील बाजार समितीत डॉ. आण्णाभाऊ साठे युवा मंचच्या वतीने लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती साजरी करण्यात आली.



प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. याप्रसंगी संजय गांगड, संजय फंड, आशिष धनवटे, किशोर रोकडे, अण्णा भालेराव यांच्यासह अनेक मान्यवर व कार्यकर्ते उपस्थित होते.

# नेवासा येथे सर्वपक्षीयांच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती औदुंबर चौकातील प्रणाम हॉल येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमास उपस्थित सर्वपक्षीय मान्यवरांच्या हस्ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन त्यांना अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविक व स्वागत जयंती कार्यक्रमाचे संयोजक डॉ. राहुल चव्हाण यांनी करुन लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे कार्याची माहिती दिली.कृषी बाजार समिती सभापती नंदकुमार पाटील यांनी अण्णाभाऊ साठे यांचे कार्य आकाशाएवढे असुन समाजाला दिशा दर्शक असून त्यांनी साहित्यातून व पोवडयाद्रे समाज जनजागृतीचे काम करून समाजाला नवी दिशा देण्याचे काम केले असल्याचे सांगितले. याप्रसंगी नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले, ॲड. संजय सुखदान रामभाऊ केंदळे, भास्कर कणगरे, भाजपचे मंडलाध्यक्ष मनोज पारखे नगरसेवक स्वप्निल मापारी,विकास चव्हाण यांनी मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी उपनगराध्यक्ष शालिनीताई सुखदान, नगरसेवक संभाजी धोत्रे, जालिंदर गवळी, मुक्तार शेख, दिनेश व्यवहारे, प्रवीण सरोदे, कृष्णा परदेशी, अंकुश म्हस्के, संदीप सरकाळे, अनिल पवार, स्वप्नील मापारी, राजेंद्र काळे,मोहन भवाळ,सुभाष चव्हाण,इस्माईल जहागीरदार, सचिन वडागळे,गणपत मोरे,शेंडगे,पास्टर चक्रणारायन, शांतवन खंडागळे,अनिल सोनवणे, शिवा राजगिरे, प्रशांत औटी,बाबा लष्करे,ओंकार साळुंके,आकाश एरंडे, विल्यम गायकवाड,राहुल चक्रनारायण आदी उपस्थित होते.नगरसेविका सोनलताई चव्हाण यांनी आभार मानले.

# लोकसहभागातून संपूर्ण नेवासा शहर आणि नेवासा फाटा सीसीटीव्हीच्या नजरकैदेत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** नेवासा शहर आणि नेवासा फाटा परिसराच्या सुरक्षेचा प्रश्न अनेक वर्षांपासून रेंगाळलेला होता. मात्र, नुकतेच हजर झालेले पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी आपल्या खास पोलीस कौशल्याचा वापर करत, लोकसहभागातून या संपूर्ण परिसराला सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या भक्कम सुरक्षेचे कवच मिळवून दिले आहे. त्यांच्या या धाडसी आणि कौतुकास्पद नियोजनामुळे आता संपूर्ण नेवासा परिसर सीसीटीव्हीच्या तिसऱ्या डोळ्याच्या थेट नियंत्रणाखाली आला आहे.

यापूर्वी नेवासा शहरात सीसीटीव्ही बसवण्यावरून केवळ राजकारण आणि टोलवाटोलवी पाहायला मिळत होती. पोलीस प्रशासन हा विषय नगरपंचायतकडे ढकलायचे तर नगरपंचायत पोलीस प्रशासनाकडे बोट दाखवायची.यापूर्वी अनेक पोलीस निरीक्षक लोकप्रतिनिधी,नगरसेवक आणि नगराध्यक्ष आले आणि गेले; परंतु प्रत्यक्षात सुरक्षेच्या दृष्टीने असे ठोस नियोजन कोणालाही करता आले नाही. नेवासा शहराच्या सुरक्षेची जिम्मेदारी घेण्यास कोणीही गंभीर नव्हते.

परिसरातील महत्त्वाचे चौक आणि परिसर हायटेक लोकसहभागातून बघता-बघता नेवासा शहरातील आणि फाट्यावरील मुख्य आणि संवेदनशील ठिकाणे सुरक्षित करण्यात आली आहेत. यामध्ये प्रामुख्याने गणपती चौक, बस स्टँड परिसर, पंचायत समिती परिसर, नगरपरिषद परिसर तसेच नेवासा फाट्यावरील राजमुद्रा चौक आणि आंबेडकर चौक या विविध ठिकाणी उच्च क्षमतेचे सीसीटीव्ही



कॅमेरे बसवण्यात आले आहेत.

प्रशासकीय दिरंगाईला बाजूला सारून लोकसहभागाच्या ताकदीवर अवघ्या काही दिवसांत नेवासा शहराचा सुरक्षा स्तर 'हायटेक' करणाऱ्या पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या या युक्तीचे सर्वत्र कौतुक होत आहे. सुरक्षिततेची नवी पहाट आणल्याबद्दल नेवासातील व्यापारी, महिला आणि सर्वसामान्य जनता त्यांचे आभार मानत आहे.

या कॅमेऱ्यांचा एक्सेस पूर्णपणे गुगल बॅकअप आणि मोबाईलवर कनेक्टेड असून सर्व डेटा क्लाउडवर सुरक्षितपणे स्टोअर होतो. विशेष म्हणजे, जर कोणी हे कॅमेरे चोरण्याचा किंवा नष्ट करण्याचा प्रयत्न केला, तरीही शेवटच्या सेकंदापर्यंतचे रेकॉर्डिंग क्लाउड स्टोरेज मार्फत पोलिसांना तात्काळ उपलब्ध होईल. भविष्यातही शहरातील इतर अनेक ठिकाणी कॅमेरे बसवायचे असून नागरिकांनी अशाच प्रकारे पुढे येऊन सहकार्य करावे.

**प्रताप दराडे**
**(पोलीस निरीक्षक, नेवासा)**

### थेट मोबाईलवर नियंत्रण; गुन्हेगारांचे धाबे दणाणले

या मोहिमेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, या सर्व सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे संपूर्ण कव्हरेज पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी स्वतःच्या मोबाईलवर घेतले आहे. ते स्वतः अत्यंत बारकाईने नेवासा शहर आणि फाटा परिसरातील हालचालींवर २४ तास नजर ठेवून आहेत. यामुळे शहरातील टवाळखोर, चोऱ्या आणि इतर गुन्हेगारी प्रवृत्तींना आळा बसणार असून गुन्हेगारांचे धाबे पार दणाणले आहेत.

# अण्णाभाऊ साठे यांचे विचार सर्वत्र पोहोचवा : आ. खताळ

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती साजरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर ।** लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे हे केवळ एका समाजाचे नेते नव्हते, तर कष्टकरी, शेतकरी, कामगार तसेच वंचित-शोषित समाजाच्या हक्कांसाठी आयुष्यभर लढणारे लोकनेते होते. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत त्यांनी दिलेले योगदान इतिहासात अजरामर आहे. त्यांच्या विचारांचा वारसा आणि कार्य पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे ही आजच्या समाजाची सामूहिक जबाबदारी आहे, असे प्रतिपादन आमदार अमोल खताळ यांनी केले.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाजवळ शिवसेना, महायुती आणि लहुजी शक्ती सेनेच्या वतीने अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार खताळ बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जनता दलाचे साथी विनायक माळवे, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख रमेश काळे, तालुका संघटक मंजाबापू साळवे, राजेंद्र बलसाने, नगरसेविका साक्षी सूर्यवंशी, प्रवीण दिड्डी, विकास पुंड,बाळासाहेब शेटे, विकास जाधव, संगीता पुंड, सपना जाधव, आरती पगारे आदी मान्यवर उपस्थित होते.

आ. खताळ म्हणाले की, संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी दिलेले योगदान कधीही विसरून चालणार नाही. महाराष्ट्राच्या अस्मितेसाठी त्यांनी उभारलेला संघर्ष आणि शाहिरीच्या माध्यमातून जनजागृती करण्याचे कार्य प्रेरणादायी



आहे. ब्रिटिश सत्तेविरुद्ध त्यांनी आपल्या शाहिरीतून आवाज बुलंद केला. तसेच समाजातील वंचित, शोषित आणि उपेक्षित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी आयुष्यभर कार्य केले.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य देश-विदेशात गौरविले गेले आहे. ते केवळ साहित्यिक नव्हते, तर सामान्य माणसाच्या स्वाभिमानाचे प्रतीक होते. जातीभेद, वर्गीय शोषण आणि सामाजिक अन्यायाविरोधात त्यांनी आपल्या लेखणी आणि शाहिरीच्या माध्यमातून प्रभावी लढा उभारला. त्यांच्या विचारांनी लाखो वंचितांना आत्मविश्वास आणि स्वाभिमानाने जगण्याची प्रेरणा दिली असल्याचे आमदार अमोल खताळ यांनी सांगितले.

### संगमनेरच्या विकासात सर्व समाजघटकांना समान न्याय

संगमनेरच्या विकासासाठी सर्व समाजघटकांना समान न्याय देण्याचा आपला सातत्यपूर्ण प्रयत्न आहे. महापुरुषांच्या जयंती उत्साहात साजऱ्या करण्याची परंपरा आपण संगमनेरमध्ये सुरू केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि महायुती सरकारच्या पुढाकारातून मुंबईतील चिरागनगर येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारक व प्रशिक्षण संस्थेसाठी ३०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या माध्यमातून तरुण उद्योजक, महिला आणि विद्यार्थ्यांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत.

**– अमोल खताळ**
**आमदार**

# बेलापूरमध्ये अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बेलापूर, :** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती तसेच लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी बेलापूर ग्रामपंचायत व साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे उत्सव समितीच्या वतीने उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज चौकात अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेची आकर्षक सजावट करून पूजन करण्यात आले. पोवाडे, गीतांचे सादरीकरण, वाद्यवृंद आणि घोषणांनी परिसर भक्तिमय व उत्साही वातावरणाने दुमदुमून गेला. ग्रामपंचायत, विविध कार्यकारी सोसायटी, सामाजिक संस्था, पदाधिकारी व ग्रामस्थांनी अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. ग्रामपंचायत कार्यालयातही अण्णाभाऊ साठे जयंती आणि लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रम झाला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अण्णाभाऊ साठे जयंती समितीचे अध्यक्ष रोहन शेलार, उपाध्यक्ष आदित्य शेलार यांच्यासह बाबासाहेब शेलार, रमेश शेलार, प्रदीप (बंटी) शेलार, अजय शेलार, सुहास शेलार व समितीच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास ग्रामपंचायतीचे पदाधिकारी, विविध संस्थांचे प्रतिनिधी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.




हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द • ख • ल

## लोकशाहीर अण्णासाहेब साठे यांची जयंती साजरी



**सोनई** : येथील आदर्श विद्यालयात माध्यमिक विभागामध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांचे पुण्यतिथी मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक पवार होते. प्रशांत गडाख व सर्व शिक्षक वृंद यांच्या हस्ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. तसेच विद्यालयामध्ये नव्याने रुजू झालेल्या शिक्षिका वीरकर व बुधवंत यांचाही सत्कार करून स्वागत करण्यात आले. शिक्षक गुलदगड यांच्या सह शिक्षकांनी परिश्रम घेतले.प्रास्ताविक आवटे व सूत्रसंचालन आवटे तर आभार कुतवळ यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष पवार एस. पी. यांनी मनोगत व्यक्त केले व आपले विचार मांडले मंगलमय वातावरणामध्ये कार्यक्रम साजरा करण्यात आला.

## रिमझिम पावसात श्री छत्रपती शिवाजी विद्यालयात आजी-आजोबा मेळावा



**झरेकाठी** : लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सुष्मिता विखे यांच्या नाती जपूया, संस्कार रुजवूया या संकल्पनेतून श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, पाथरे बु. येथे आजी-आजोबा मेळावा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाबासाहेब सीताराम पाटील घोलप होते. कार्यक्रमात आजी-आजोबांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांनी स्वागतगीत, सांस्कृतिक कार्यक्रम आणि मनोगतांद्वारे ज्येष्ठांप्रती आदर व कृतज्ञता व्यक्त केली. रिमझिम पावसाच्या साक्षीने आयोजित विविध मनोरंजक खेळांमध्ये आजी-आजोबा, पालक व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. आकर्षक सेल्फी पॉइंटही उपस्थितांचे विशेष आकर्षण ठरला. यावेळी मान्यवरांनी आजी-आजोबांचे कुटुंबातील स्थान, त्यांचे अनुभव आणि संस्कारांचे महत्त्व अधोरेखित केले. प्राचार्यांनी, आजी-आजोबांचा सहवास ही मुलांच्या सर्वांगीण विकासाची अमूल्य शिदोरी असून अशा उपक्रमांमुळे पिढ्यांतील प्रेम, जिव्हाळा आणि संस्कारांचे बंध अधिक दृढ होतात, असे सांगितले. शेवटी उपस्थित आजी-आजोबा, पालक, ग्रामस्थ, शिक्षक व विद्यार्थ्यांचे आभार मानून अल्पोपहारासह कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## छावा ब्रिगेडच्या प्रदेशाध्यक्षपदी प्रविण कानवडे यांची नियुक्ती

**संगमनेर** : छावा ब्रिगेडच्या प्रदेशाध्यक्षपदी प्रविण कानवडे उपाध्यक्षपदी प्रदीप औटी यांची , तर संगमनेर तालुका अध्यक्षपदी प्रविण कासार आणि संगमनेर शहर अध्यक्षपदी ज्ञानेश्वर माळी निवड करण्यात आली आहे. छावा ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष विश्वनाथ वाघ यांच्यामार्गदर्शनाखाली व प्रदेश कार्याध्यक्ष गणेश तोरमल यांच्या प्रमुख उपस्थितीत निवड करण्यात आली.



यावेळी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा छत्रपती संभाजी महाराज यांची प्रतिमा देऊन सन्मान करण्यात आला छावा बिग्रेड संघटना ही छत्रपती, शाहू - फुले - आंबेडकर यांच्या विचारांनी चालणारी संघटना असून सर्वांना बरोबर घेवून विश्वासाने, काम करत आहे. यावेळी छावा ब्रिगेडचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष राजाराम शिंदे आरपीआयचे जिल्हा उपाध्यक्ष योगेश बनसोडे, राजे प्रतिष्ठानचे शंकर गोरडे यांसह अनेक मान्यवर, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिद्द, शिस्त आणि सातत्य हाच यशाचा खरा मंत्र : आ. काळे

### श्री छत्रपती शिवाजी विद्यालयात स्पर्धा परीक्षा व पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण केंद्राचा शुभारंभ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**कोळपेवाडी** : आजचे युग हे अत्यंत स्पर्धेचे आहे अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांनी यश मिळवायचे असेल तर जिद्द, शिस्त आणि सातत्यपूर्ण परिश्रमाची साथ कधीही सोडू नये. ध्येय निश्चित करून प्रामाणिकपणे मेहनत घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कोणतीही स्पर्धा कठीण नसते. निरोगी शरीर, सकस आहार आणि नियमित अभ्यास या त्रिसूत्रीच्या बळावरच यशाचे शिखर गाठता येते असे प्रतिपादन आमदार आशुतोष काळे यांनी केले.

कोपरगाव तालुक्यातील सुरेगाव-कोळपेवाडी येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात कर्मवीर भाऊराव पाटील अकॅडमी अंतर्गत कर्मवीर शंकरराव काळे स्पर्धा परीक्षा व पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन शनिवार (दि.१) रोजी आमदार आशुतोष काळे यांच्या हस्ते पार पडले. यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना ते बोलत होते.ते पुढे म्हणाले की,रयत शिक्षण संस्था काळाच्या पाऊलखुणा ओळखून शिक्षणात नवनवीन प्रयोग करत असते. सध्याच्या तंत्रज्ञानाच्या युगात संस्थेच्या शाळांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता तसेच इंटरक्टिव्ह बोर्ड यांसारखे अत्याधुनिक उपक्रम राबवले जात आहेत. संस्थेचे अध्यक्ष खा.शरदचंद्रजी पवार साहेब, चेअरमन चंद्रकांत दळवी, उपाध्यक्ष आणि मॅनेजमेंट कौन्सिलचे सर्व सदस्य नेहमीच विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी दूरदृष्टीचे निर्णय घेतात. आजच्या स्पर्धेच्या युगात ग्रामीण भागातील विद्यार्थी कुठेही मागे पडू नयेत तसेच विविध भरती प्रक्रियेत त्यांनी यश मिळवून बौद्धिक व शारीरिकदृष्ट्या परिपक्व होवून या देशाचा यशस्वी नागरीक व्हावे यासाठी संस्थेने कर्मवीर भाऊराव पाटील अकॅडमी सुरु करून महत्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

ज्या विद्यार्थ्यांना पोलीस किंवा सैन्यदलात करिअर करण्याची इच्छा आहे त्या विद्यार्थ्यांना कर्मवीर भाऊराव पाटील अकॅडमीच्या माध्यमातून प्रशिक्षणाचे नवे दालन खुले झाले आहे. अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी यशस्वी व्हायचे असेल तर जिद्द, शिस्त आणि सातत्यपूर्ण परिश्रमाची कास धरली पाहिजे. ध्येय स्पष्ट असेल आणि त्यासाठी प्रामाणिक मेहनत घेतली, तर कोणतीही स्पर्धा कठीण राहत नाही. मोबाईल हे आजच्या काळातील गरजेचे साधन असले तरी त्याचा वापर किती आणि कसा करायचा याचे भान विद्यार्थ्यांनी ठेवले पाहिजे. नाहीतर मोबाईलचे व्यसन लागू शकते. माणूस व्यसनामध्ये पूर्णपणे वाहून जातो त्यामुळे त्याचे आयुष्य उद्ध्वस्त होते. आपले आरोग्य व भविष्य चांगले घडवायचे असेल तर विद्यार्थ्यांनी व्यसनांपासून पूर्णपणे दूर राहून जिद्दीने अभ्यास करून देशाची व राज्याची सेवा करावी. आपल्या कर्तृत्वातून आपल्या गावाचे, कुटुंबाचे, पालकांचे आणि शाळेचे नाव मोठे करावे असा मौलिक सल्ला आमदार आशुतोष काळे यांनी यावेळी दिला.

याप्रसंगी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुण चंद्रे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष कचरु कोळपे, पं.स.माजी उपसभापती वाल्मिकराव कोळपे, दिलीपराव वाबळे, गौतम बँकेचे संचालक राजेंद्र ढोमसे, हेमंत वाबळे, कमलेश भळगट, यशवंत निकम, मोतीराम निकम, प्रशिक्षक गौतमी बनकर, राजेंद्र धुमाळ, बापूसाहेब वाबळे, प्राचार्य प्रकाश चौरे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, ग्रामस्थ आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बुवा सिद्धदेव मंदिरात जाण्यावरून मारहाण व जातीवाचक शिवीगाळ, अ‍ॅट्रोसिटी दाखल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : शहरातील बुवा सिद्ध देव गल्ली परिसरात मंदिरात जाण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून एका तरुणाला मारहाण करण्यात आल्याची घटना समोर आली आहे.

या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात पाच जणांविरुद्ध गंभीर कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटने संदर्भात मिळालेल्या माहितीनुसार, निखील राजू नारद (वय २४, रा. बुवासिद्ध देव गल्ली, राहुरी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शाहरुख फारुख शेख, आरिफ आयुब इनामदार, मुसा चाँद शेख, मोहसिन उर्फ गोच्या अकबर शेख आणि शाहबाज उर्फ मुर्गी अन्सार सय्यद (सर्वजण रा. राहुरी) यांच्याविरोधात राहुरी पोलिसात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या घटनेत दि. ३० जुलै २०२६ रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास फिर्यादीच्या घरासमोर आरोपींनी एकत्र येत त्यांच्याशी वाद घालत मारहाण केल्याचा आरोप आहे. तसेच जातीवाचक शब्द वापरून शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. घटनेदरम्यान मध्यस्थी करण्यासाठी आलेल्या साक्षीदारांनाही दमदाटी केल्याचेही समोर आले आहे.

या प्रकरणी भारतीय न्याय संहिता कलमे तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. या घटनेत जखमी झालेल्या तरुणांवर राहुरी येथील ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार करण्यात आले. श्रीरामपूर चे पोलीस उपाधीक्षक जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक तपासी अधिकारी निरीक्षक रविंद्र देशमुख हे या घटनेचा सखोल तपास करत आहेत. आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवुन फिर्यादीस जातीवाचक शिवीगाळ करून तु बुवा सिद्ध देव मंदिरामध्ये आरती करण्यासाठी कशाला गेला तुमची मंदीरामध्ये जायची लायकी नाही. तुमची ढोर जात आहे. तुम्ही मंदीरामध्ये गेले तर आम्हाला मंदीर धुवायला लागते. तुम्ही हलक्या जातीचे असुन तुझ्या आजोबाचा चमड्या चा धंदा होता तेव्हा तुम्हाला इथे कोणीही हिंदु जवळ करीत नव्हते आणि तुम्ही आता जास्त देव देव करायला लागले का ? ही आमची मुस्लिम समाजाची दर्गा आहे तुमचे मंदीर नाही. तु परत मंदिरात जायचे नाही असे म्हणुन फिर्यादीस लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व जिवे मारण्याची धमकी दिली आहे. तेव्हा फिर्यादीस सोडविण्यासाठी आलेल्या साक्षीदार यांना देखील शिवीगाळ दमदाटी केली आहे.

## आरोग्य सेवेतील हलगर्जीपणा खपवून घेणार नाही : आ. खताळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये डॉक्टर व कर्मचाऱ्यांची अनुपस्थिती, स्वच्छतेचा अभाव, लसीकरणातील अडचणी, आवश्यक औषधांचा तुटवडा तसेच नागरिकांकडून सातत्याने येणाऱ्या तक्रारींची गंभीर दखल घेत आरोग्य सेवेतील कोणताही हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही, असा स्पष्ट इशारा आमदार अमोल खताळ यांनी आरोग्य विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिला. संगमनेर पंचायत समिती आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी आढावा बैठक आ. अमोल खताळ यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. यावेळी गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे, सहाय्यक गटविकास अधिकारी राजेंद्र ठाकूर, तालुका आरोग्य अधिकारी उमेश गोडे, सहाय्यक पशुसंवर्धन आयुक्त प्रदीप खंडेराव,ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. राजकुमार जऱ्हाड, भाजप अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष रऊफ शेख, कैलास कासार, भाजप उपाध्यक्ष रवींद्र दातीर, नगरसेविका साक्षी सूर्यवंशी यांच्यासह तालुक्या तील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांचे वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. आ. खताळ म्हणाले की, संगमनेर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रां मध्ये डॉक्टर आणि कर्मचारी यांच्या अनुपस्थितीबाबत सातत्याने तक्रारी प्राप्त होत आहेत. यापुढे अशा प्रकारच्या तक्रारी येणार नाहीत, याची प्रत्येकाने काळजी घ्यावी.नागरिकांना वेळेत आणि दर्जेदार आरोग्य सेवा मिळणे ही प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याची जबाबदारी आहे. कामात तातडीने सुधारणा करावी, अन्यथा संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल. मी कोणत्याही क्षणी प्राथमिक आरोग्य केंद्राला पूर्वसूचना न देता अचानक भेट देऊ शकतो. त्या वेळी संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी अनुपस्थित आढळल्यास त्यांच्यावर तातडीने कारवाई केली जाईल . कर्तव्यातील निष्काळजी पणा कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतला जाणार नाही.आमदार झाल्या नंतर आरोग्य विभागाशी संबंधित केवळ दोन वेळा कारवाई करण्याची वेळ आली असल्याचे सांगत, भविष्यात अशी परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी प्रत्येकाने आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडावे, असे आवाहनही त्यांनी केले. राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्य मंत्री सुनेत्रा पवार, आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर तसेच पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचेही आमदार अमोल खताळ यांनी यावेळी सांगितले. बैठकीत प्राथमिक आरोग्य केंद्रांतील स्वच्छता, लसीकरण मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी, औषधांचा नियमित पुरवठा, रुग्णांना वेळेत सेवा उपलब्ध करून देणे तसेच नागरिकांच्या तक्रारींचे तातडीने निराकरण करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. आरोग्य सेवा अधिक परिणामकारक व लोकाभिमुख करण्यासाठी सर्व अधिकाऱ्यांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.

# श्री संत सावता महाराज पायी दिंडी सोहळ्याची काल्याच्या कीर्तनाने सांगता

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोल्हार** : श्रीक्षेत्र कोल्हार खुर्द ते पंढरपूर या श्री संत सावता महाराज पायी दिंडी सोहळ्याची सांगता गुरुपौर्णिमेनिमित्त ह.भ.प. शंकर महाराज लोखंडे यांच्या काल्याच्या कीर्तनाने भक्तिमय वातावरणात झाली. अनुशंकर मंगल कार्यालयात आयोजित या सोहळ्यास वारकरी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित काल्याच्या कीर्तनात मार्गदर्शन करताना हभप. शंकर महाराज लोखंडे.
(छाया : गणेश कुंभकर्ण )

गेल्या ५० वर्षांपासून अखंड सुरू असलेल्या या पायी दिंडीची परंपरा वैकुंठवासी ह.भ.प. लहानुबाबा हारदे यांच्या मार्गदर्शनाखाली ह.भ.प. माधवराव बाळाजी शिरसाठ (भाऊ पाटील) तसेच सहकारी वारकरी, विणेकरी आणि भजनी मंडळींनी सुरू केली. यंदा सुवर्णमहोत्सवी वर्षातही ही परंपरा अविरतपणे कायम राहिल्याने वारकरी संप्रदायात विशेष उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. कीर्तनात ह.भ.प. शंकर महाराज लोखंडे यांनी सत्संग, गुरुभक्ती आणि आध्यात्मिक साधनेचे महत्त्व विशद करत गुरूच्या सान्निध्यातूनच परमार्थाचा खरा आनंद प्राप्त होतो, असे प्रतिपादन केले.

यावेळी दिंडीस सहकार्य करणाऱ्या देणगीदार, अन्नदाता आणि वारकरी मंडळींचा सत्कार करण्यात आला. दिंडीदरम्यान वृक्षारोपण करून 'झाडे लावा, झाडे जगवा'चा संदेश देणारे ह.भ.प. डॉ. अनिल महाराज लोखंडे यांचा श्री संत सावता महाराजांची प्रतिमा व प्रासादिक नित्य भजनी मालिका भेट देऊन गौरव करण्यात आला. विणेकरी ह.भ.प. जगन्नाथ घोगरे यांनी महाप्रसादाची व्यवस्था केली. कार्यक्रमास प्रा. दिगंबर पाटील शिरसाठ, ह.भ.प. अनिल पाटील शिरसाठ, सोपानराव पाटील शिरसाठ यांच्यासह विविध मान्यवर व महिला-पुरुष वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अमृतवाहिनी निडो इंटरनॅशनल स्कूलच्या सहा विद्यार्थ्यांची इस्त्रो अभ्यास दौऱ्यासाठी निवड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**संगमनेर** : महाराष्ट्राचे माजी शिक्षणमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली आणि शरयूताई देशमुख यांच्या संकल्पनेत उभारलेल्या अमृतवाहिनी निडो इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सी. व्ही. रमण परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले असून विद्यालयातील सहा विद्यार्थ्यांची इस्रो अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली आहे.

अशी माहिती प्राचार्या अंजली कन्नावार यांनी दिली. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान विषयाची आवड आणि संशोधनाची जिज्ञासा निर्माण करण्यासाठी विद्यालयात सातत्याने विविध उपक्रम राबविले जातात. राज्यस्तरीय सी. व्ही. रमण परीक्षेत विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत तालुका व जिल्हास्तरावर मानाचे स्थान मिळवले.

इयत्ता पाचवीतील कु. श्रीमयी अमोल सानप हिने ८८.८८ टक्के गुणांसह तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला. इयत्ता सहावीतील चेतन भवरलाल गुर्जर याने ८० टक्के गुणांसह प्रथम, तर रुद्र भूषण बोऱ्हाडे याने ७४ टक्के गुणांसह तालुक्यात चौथा क्रमांक मिळवला. इयत्ता आठवीतील विक्रांत प्रदीप कुटे याने ७४.६७ टक्के गुणांसह तृतीय, तर कु. अर्चल नितीन वाळुंज हिने ७०.६७ टक्के गुणांसह सहावा क्रमांक पटकावला. इयत्ता नववीतील पृथ्वीराज किरण नेहे याने ८२.६७ टक्के गुण मिळवत जिल्ह्यात चौथा क्रमांक मिळवला.

यशस्वी विद्यार्थ्यांचे माजी शिक्षणमंत्री बाळासाहेब थोरात, कार्यकारी विश्वस्त शरयूताई देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, अकॅडमिक डायरेक्टर डॉ. जे. बी. गुरव, व्यवस्थापक प्रा. व्ही. बी. धुमाळ, प्राचार्या अंजली कन्नावार तसेच संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## एकलव्य संघटनेच्या श्रीरामपूर तालुकाध्यक्षपदी रमजान उस्मान शेख



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : सामाजिक कार्यकर्ते रमजान उस्मान शेख यांची एकलव्य संघटनेच्या श्रीरामपूर तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. संघटनेचे संस्थापक व प्रदेशाध्यक्ष पवनराजे सोनवणे यांच्या स्वाक्षरीने त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. एकलव्य संघटना ही छत्रपती शाहू महाराज, महात्मा जोतिराव फुले, डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या विचारांवर कार्यरत असून आदिवासी, भटके-विमुक्त समाजाच्या प्रश्नांसाठी काम करते. तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या शासनापर्यंत पोहोचवून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शांततामय मार्गाने आंदोलन करण्याचे कार्य संघटनेमार्फत केले जाते, असे प्रदेशाध्यक्ष पवनराजे सोनवणे यांनी सांगितले. रमजान शेख हे विविध सामाजिक संघटनांमध्ये सक्रिय असून समाजकार्यात त्यांचा उल्लेखनीय सहभाग आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांच्यावर श्रीरामपूर तालुकाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यांच्या निवडीबद्दल विविध क्षेत्रातील पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार व मान्यवरांनी अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार मायकल मुनतोडे यांनी केले, तर आभार राजू पवार यांनी मानले.

# कापूस लागवड तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यास उत्पादनात लक्षणीय वाढ शक्य : डॉ. पवन कुलवाल



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील कापूस सुधार प्रकल्पाने तयार केलेली कापूस पीक लागवडीची पंचसूत्री कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी फार महत्त्वाची आहे. यामध्ये योग्य वाणाची निवड, वेळेवर पेरणी, शिफारशीनुसार लागवडीचे अंतर, संतुलित खतांचा वापर, योग्य पाणी व्यवस्थापन आणि शास्त्रीय वाढ नियंत्रण या बाबींचा समावेश आहे. या सर्व बाबींचा अवलंब केल्यास उत्पादनात लक्षणीय वाढ साध्य करता येते असे प्रतिपादन कापूस सुधार प्रकल्पाचे प्रमुख व कापूस पैदासकार डॉ. पवन कुलवाल यांनी केले. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील कापूस सुधार प्रकल्पांमध्ये शेतकरी शास्त्रज्ञ मंचाची बैठक, कापूस पिक चर्चा सत्र व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन प्रकल्पाचे प्रमुख डॉ. पवन कुलवाल यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. याप्रसंगी अध्यक्षस्थानावरून मार्गदर्शन करताना डॉ. पवन कुलवाल बोलत होते.

याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून अंतरविद्याशाखा जलसिंचन व्यवस्थापन विभागाचे प्रमुख डॉ. व्ही. एस. पाटील उपस्थित होते. यावेळी डॉ. व्ही. एस. पाटील यांनी कापूस पिकातील संतुलित खत व्यवस्थापन व जमिनीचे आरोग्य या विषयावर मार्गदर्शन केले. माती परीक्षणाच्या आधारे शिफारशीनुसार खतांचा वापर केल्यास उत्पादन वाढीसह जमिनीची सुपीकता दीर्घकाळ टिकून राहते असे त्यांनी यावेळी सांगितले. कापूस प्रकल्पाचे कीटकशास्त्रज्ञ डॉ. नंदकुमार भुते यांनी एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन तसेच जैविक निविष्ठांचा वापर, सहाय्यक कृषीविद्यावेता डॉ. नवनाथ मेढे यांनी एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन व तण नियंत्रण या विषयावर मार्गदर्शन केले. याप्रसंगी शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचे श्री. प्रकाश धोंडे तसेच प्रगतशील शेतकरी श्री. राजू येवले यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भुईमूग पैदासकार डॉ. अधीर आहेर यांनी केले. कार्यक्रमाचे आभार डॉ. शिल्पा गायकवाड यांनी मानले. या कार्यक्रमासाठी मंडल कृषी अधिकारी अशोक गिरगुणे तसेच राम मिसाळ, कापूस सुधार प्रकल्पातील अधिकारी व कर्मचारी, शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचे सदस्य तसेच सडे, पिंपरी अवघड, गोटुंबे आखाडा, वरवंडी, येवले आखाडा, वराळे वस्ती आणि राहुरी परिसरातील कापूस उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सिंधुताई विखे यांचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी : प्राचार्य डॉ. आर.ए. पवार



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर** : स्व. सिंधुताई विखे पाटील यांनी शिक्षण, समाजसेवा आणि महिला सक्षमीकरणाच्या माध्यमातून समाजात निर्माण केलेला आदर्श आजच्या पिढीसाठी दिशादर्शक आहे. त्यांच्या कार्यातून समाजहिताची जाणीव आणि सेवाभावाची प्रेरणा मिळते, असे प्रतिपादन पद्मश्री विखे पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.ए. पवार यांनी केले. स्व. सिंधुताई विखे पाटील यांच्या जयंतीनिमित्त तसेच लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथी आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात डॉ.पवार बोलत होते. डॉ. पवार यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात लोकमान्य टिळक यांच्या राष्ट्रप्रेम, स्वाभिमान आणि लोकजागृतीच्या विचारांचा तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या समतावादी साहित्याचा आणि सामाजिक परिवर्तनाच्या संदेशाचा विद्यार्थ्यांनी आदर्श घ्यावा, असे आवाहन केले. महान व्यक्तिमत्त्वांचे विचार केवळ स्मरणात न ठेवता ते आचरणात आणणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असेही त्यांनी नमूद केले. यावेळी डॉ. संगीता वाकोळे यांनी स्वर्गीय सिंधुताई विखे पाटील, लोकमान्य टिळक आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्याचा आढावा घेत त्यांच्या विचारांची आजच्या काळातील उपयुक्तता विद्यार्थ्यांना पटवून दिली. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते तिन्ही महनीय व्यक्तिमत्त्वांच्या प्रतिमांचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी डॉ. अनिल वाबळे, डॉ. भाऊसाहेब रणपिसे, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन प्रा. साईप्रसाद कुंभकर्ण यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. जयप्रकाश परदेशी यांनी मानले.

निशाणी नंबर: ०७
**जाहीर नोटीस**
अ‍ॅड.एस.एस.गोर्ड
नेवासा कोर्ट, नेवासा
दिनांक : ०१/०८/२०२६
नेमलेली तारीख : ०३/०९/२०२६
नेवासा येथील मे. सिव्हिल जज्ज साहेब ज्यु.डी यांचे कोर्टात वारस चौ.अ.नं.१००/२०२६
**अर्जदार** – सुमित रामचंद्र मोटे, वगैरे
**सामनेवाले** – कुणीही नाही
**मयत** – रामचंद्र मुरलीधर मोटे, मयत दिनांक १३/०५/२०२५

वरील अर्जदार यांनी सदरचा अर्ज या मा. न्यायालयामध्ये मयतास अर्जदार हे वारस आहेत, म्हणुन वारस प्रमाणपत्र मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. मयत रामचंद्र मुरलीधर मोटे हे दि.१३/०५/२०२५ रोजी मयत झालेले आहेत. त्यांना वरीलप्रमाणे अर्जदार नं.१ ते ४ हेच कायदेशीर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळावे म्हणुन अर्जदार यांनी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदरील वारस प्रमाणपत्र संबंधी कुणाचेही काहीएक म्हणणे किंवा कुणाची काही एक हरकत असेल तर या जाहीर नोटीस प्रसिध्द तारखेपासुन ३० दिवसाच्या आत मा. न्यायालयात स्वतः अगर वकीलामार्फत सर्व कागदपत्रानिशी उपस्थित रहावे अन्यथा उपस्थित राहण्यास कसुर केल्यास सदरील अर्जाची सुनावणी होवून योग्य तो हुकुम केला जाईल याची नोंद घ्यावी.आज दि.०१/०८/२०२६ रोजी माझी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी नोटीस दिली असे.
नेवासा
नेमलेली तारीख : ०३/०९/२०२६
शिक्का

**व लिपीक**
**दिवाणी न्यायालय, क. स्तर**
**नेवासा**

**हुकुमावर**
**सहा अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, क. स्तर**
**नेवासा**

## पान १ वरुन

### कर्जमाफी नव्हे तर शेतकऱ्यांच्या गळ्यात 'ओटीएस'चा फास!

काय केले, असा प्रश्न उपस्थित केला.यावेळी त्यांनी उद्योगपती आणि शेतकरी यांच्यातील दुजाभावाचाही मुद्दा उपस्थित केला. उद्योगपतींची हजारो कोटींची कर्जे माफ करण्यासाठी सरकारकडे पैसा आहे, पण शेतकऱ्यांसाठी ओटीएस आणली जाते. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनी पाप केले आहे का? त्यांना केवळ ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान का? ही रक्कम दोन लाख रुपये करा, अशी मागणी त्यांनी केली.

तसेच तीनही कर्जमाफी योजनांतून वंचित राहिलेले शेतकरी, आयकर भरणारे शेतकरी, पीककर्जाचे पुनर्गठन केलेले शेतकरी, मयत शेतकऱ्यांचे वारसदार यांनाही या योजनेचा लाभ मिळावा, अशी मागणी त्यांनी केली. एखादा थकीत कर्जदार शेतकरी मयत झाल्यानंतर त्याची केवायसी किंवा फार्मर आयडी नसल्याने कुटुंबीयांना लाभ मिळत नसेल, तर त्यासाठी स्वतंत्र तरतूद करण्याची मागणीही त्यांनी केली.

यावेळी त्यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नावरही सरकारला धारेवर धरले. कोल्हापूरसह अनेक भागांत साखर कारखान्यांनी ऊस उत्पादकांना नियमानुसार १४ दिवसांत एफआरपी दिलेली नाही. अशा कारखान्यांवर कठोर कारवाई करण्याऐवजी सरकार कारखानदारांच्या पाठीशी उभे राहत असल्याचा आरोप त्यांनी केला. गरज पडली तर ऊसाचे दांडगे हातात घेऊन या सरकारच्या आणि मंत्र्यांच्या कंबरड्यात घालू, असा आक्रमक इशाराही त्यांनी दिला.

### भोंदू अशोक खरातला सात दिवस पोलीस कोठडी

चौकशी केली असता, सर्वांनी आपण कोणतेही खाते उघडले नसल्याचे स्पष्ट सांगितले. त्यामुळे बनावट कागदपत्रांच्या आधारे ही खाती उघडल्याचा पोलीसांचा संशय अधिकच बळावला.

शिर्डीतील जमीन प्रकरणात चौकशी पूर्ण झाल्यानंतर अशोक खरातला पुन्हा नाशिक 'एसआयटी'च्या ताब्यात देण्यात आले होते. त्यानंतर समता पतसंस्थेतील १०० बनावट खातेप्रकरणाच्या तपासासाठी शिर्डीच्या 'एसआयटी'ने त्याचा ताबा घेतला आहे. काल रात्री त्याला नाशिकहून शिर्डी पोलीस ठाण्यात आणण्यात आले. त्यानंतर त्याला अटक करण्यात आली. राहाता ग्रामीण रुग्णालयात त्याची वैद्यकीय तपासणी करण्यात आली आहे. आज अशोक खरातला राहाता न्यायालयात हजर असता त्याला न्यायालयाने ७ ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी सुनावली. या प्रकरणाचा तपास एसआयटीचे अधिकारी तथा शिर्डी उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती करीत आहेत.

अशोक खरातला पुन्हा पोलिस कोठडी मिळाल्याने समता पतसंस्थेतील कथित आर्थिक गैरव्यवहाराचा तपास निर्णायक टप्प्यात पोहोचण्याची शक्यता आहे. बनावट खाती नेमकी कशासाठी उघडण्यात आली. या व्यवहारांचा प्रत्यक्ष लाभ कोणाला झाला. या रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग होता आणि या आर्थिक गैरव्यवहाराचे धागेदोरे इतर कोणत्या प्रकरणांशी जोडलेले आहेत का, याचा उलगडा पुढील चौकशीत होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या प्रकरणाकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### पंतप्रधान मोदींविषयी अपशब्द : १५ वर्षीय विद्यार्थिनीची जाहीर माफी

आली आहे. पोलिसांनी परिसरातील रहिवाशांकडे याबाबत चौकशी सुरू केली असून पुढील तपास सुरू आहे.गरज असल्यास ही बातमी दैनिकासाठी अधिक आकर्षक मथळा आणि उपमथळ्यासहही तयार करून देऊ शकतो

### १३ लाख ५६ हजारांची फसवणूक

त्यांच्या तक्रारीवरून सायबर पोलिसांनी कॅनरा बँक खाते धारक आणि एका अनोळखी इसमाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. अनोळखी व्यक्तींकडून येणाऱ्या बँक बदलाच्या ईमेलची खात्री केल्याशिवाय पैसे पाठवू नयेत, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

### मला चंद्रकांत पाटलांच्या मेंदूवरचे फिंगर प्रिंट बघायचे

म्हणतात की, आंदोलनात जे दगड फेकण्यात आले आहेत, त्या दगडावरच्या फुटप्रिंटस आधारशी लिंक केल्या जाणार आहेत, असे चंद्रकांत पाटील म्हणतात. मला चंद्रकांत पाटील यांच्या मेंदूवरचे फिंगर प्रिंट बघायचे आहेत. कोल्हापूरकरांनी या माणसाला ज्ञान मिळावं म्हणून कोल्हापूरवरुन पुण्यात पाठवलं, जे शिक्षणाचं माहेरघर आहे, पण तिथेही यांचं काही झालं नाही. आता असे शिक्षणमंत्री म्हटल्यावर जेन झी पिढीचा पारा चढणार की नाही? ते म्हणत असतील की, अशी माणसं आमच्या नशिबी आणून ठेवलेत, अशी टीका राज ठाकरे यांनी केली.

पंतप्रधान मोदी नुकताच एक व्हिडीओ शेअर केला. त्यामध्ये ते म्हणतात की, जेन झी कडून माझ्याबाबत, माझ्या आईविषयी वापरण्यात आलेली भाषा अयोग्य आहे. मी पंतप्रधानांशी याबाबत सहमत आहे. कोणाबाबतही खालच्या थरातील भाषा वापरली जाऊ नये, १०० टक्के मान्य आहे पंतप्रधानांचं. पण मला त्यांना एवढंच सांगायचं आहे की, ही गोष्ट तुमच्या पक्षातील लोकांनाही सांगा. महात्मा गांधी, नेहरु, इंदिरा गांधी यांच्यापासून आमच्यापर्यंत तुम ची ट्रोलची टीम प्रत्येक राज्यात बसवली आहे, ते कोणत्या भाषेत बोलतात. महाराष्ट्रातील अनेक कलाकार आहेत, ते म्हणतात, खूप शिव्या पडतात, आम्ही बोलत नाही. अशा ट्रोलर्सनाही पंतप्रधान मोदी यांनी सांगावे. हे सगळं गेल्या १२ वर्षात सुरु झाले आहे, तुम्ही जे पेरलं तेच उगवलं आहे, तेच तुमच्या अंगावर आलं आहे. मला आणि माझ्या आईला शिव्या दिल्या, असे पंतप्रधान बोलतात, त्यांचा मुद्दा बरोबर आहे. पण पंतप्रधान मोदी यांनी हे त्यांच्या लोकांनाही सांगावे. दुसऱ्यांनाही आया असतात, हे हे तुमच्या पक्षातील लोकांना सांगा, असे राज ठाकरे यांनी म्हटले.

# गुहा-शिबलापूर-हंगेवाडी रस्त्याच्या दुरवस्थेविरोधात सह्यांची मोहीम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी :** गुहा-शिबलापूर-हंगेवाडी या प्रमुख मार्गाची अत्यंत दुरवस्था झाल्याने संतप्त झालेल्या रुंदीकरणाची मागणी करण्यात येणार आहे.

गुहा ते शिबलापूर या सुमारे २२ किलोमीटरच्या रस्त्यावर



स्थानिक तरुणांनी व ग्रामस्थांनी प्रशासनाच्या निषेधार्थ सह्यांची मोहीम हाती घेतली असून, अवघ्या एका दिवसात तब्बल २३०० सह्या संकलित करण्यात आल्या आहेत. या सह्यांसह सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निवेदन सादर करून रस्त्याच्या तातडीने दुरुस्ती व जागोजागी मोठमोठे खड्डे पडले असून, अनेक ठिकाणी खडी उघडी पडल्याने वाहनचालकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. वारंवार करण्यात आलेली तात्पुरती डागडुजी निष्फळ ठरल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. खराब रस्त्यामुळे दुचाकी व चारचाकी वाहनांचे नुकसान होत असून अपघातांच्या घटनांमध्येही वाढ झाल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे.

या रस्त्याचा काही भाग संगमनेर तर उर्वरित भाग राहुरी तालुक्यात येत असल्याने दोन्ही तालुक्यांतील सार्वजनिक बांधकाम विभाग जबाबदारी एकमेकांवर ढकलत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. या प्रशासकीय दिरंगाईचा फटका मात्र सामान्य नागरिक, शेतकरी, विद्यार्थी आणि प्रवाशांना बसत आहे.

लोकशाही मार्गाने वारंवार निवेदने देऊनही प्रशासनाने दखल घेतली नसल्याने सह्यांची मोहीम राबविण्यात आल्याचे तरुणांनी सांगितले. गुहा ते हंगेवाडी रस्त्याचे तातडीने रुंदीकरण व काँक्रीटीकरण न झाल्यास तीव्र चक्काजाम आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. या मोहिमेनंतर तरी सार्वजनिक बांधकाम विभाग निधी उपलब्ध करून रस्त्याचे काम हाती घेणार का, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

**खड्डे वाचवा आणि बक्षीस मिळवा**

प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी काही दिवसांपूर्वी ग्रामस्थांनी ''खड्डे वाचवा आणि बक्षीस मिळवा'' अशी उपरोधिक शक्कल लढवून शासनाचा निषेध केला होता. मात्र, तरीही प्रशासनाला जाग न आल्याने आता तरुणांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. गावोगावी जाऊन हजारो नागरिकांच्या सह्या गोळा करण्यात येत आहेत. ही मोहीम तीव्र करून लवकरच हे निवेदन उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना सोपवण्यात येणार आहे

# सुब्रतो कप फुटबॉल स्पर्धेत प्रवरा पब्लिक स्कूलची विजयी भरारी

## मुलांचा संघ अजिंक्य; मुलींना उपविजेतेपद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर:** लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरानगर येथील प्रवरा पब्लिक स्कूल येथे पार पडलेल्या जिल्हास्तरीय सुब्रतो कप २०२६-२७ फुटबॉल स्पर्धेत प्रवरा पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी दमदार खेळाचे प्रदर्शन करत उल्लेखनीय यश संपादन केले. स्पर्धेतील १७ वर्षांखालील मुलांच्या संघाने सुरुवातीपासूनच आक्रमक आणि शिस्तबद्ध खेळ करत चारही सामने जिंकून अजिंक्यपदावर नाव कोरले. तर १७ वर्षांखालील मुलींच्या संघानेही उत्कृष्ट सांघिक खेळाच्या जोरावर अंतिम फेरीपर्यंत मजल मारत जिल्हास्तरावर उपविजेतेपद पटकावले. या दुहेरी यशामुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील गुणवत्तेवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे. अशी माहीती प्राचार्य डॉ.बी.बी.अंबाडे यांनी दिली. प्रवरेत शिक्षण घेणारा विद्यार्थी हा शैक्षणिक गुणवत्ते बरोबर क्रीडा क्षेत्रातही पुढे असावा यासाठी प्रत्येक शाळा महाविद्यालयांमध्ये भव्य दिव्य क्रीडांगणासह विविध सेवा सुविधा खेळासाठी उपलब्ध आहेत यामुळे प्रवरेचे खेळाडू हे आज जागतिक पातळीवर पोहोचत आहेत याच दृष्टीने प्रवरा पब्लिक स्कूलचे हे यश महत्वपूर्ण असल्याचे प्राचार्य डॉ. अंबाडे यांनी सांगितले. यशस्वी विद्यार्थ्यांना फुटबॉल प्रशिक्षक अतुल डे, क्रीडा शिक्षक जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.



# शिर्डीत क्रीडा शिक्षकांची सहविचार सभा

## राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धेच्या आयोजनाची घोषणा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** शालेय क्रीडा क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी श्री साईबाबा इंग्लिश मीडियम स्कूल, शिर्डी आणि जिल्हा क्रीडा कार्यालय, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ ची क्रीडा शिक्षक सहविचार सभा शिर्डी येथे उत्साहात पार पडली. कोपरगाव व राहाता तालुक्यातील १२५ हून अधिक क्रीडा शिक्षकांनी या सभेत सहभाग घेतला. सभेत शालेय क्रीडा स्पर्धांचे नियोजन, खेळाडूंना उपलब्ध करून द्यावयाच्या सुविधा, क्रीडा शिक्षकांची भूमिका आणि परस्पर समन्वय या विषयांवर सविस्तर चर्चा झाली. श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे नियोजन




करण्यात आले. त्यांच्या पुढाकारातून ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात शिर्डीत १४ वर्षांखालील मुला-मुलींच्या राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली. स्कूल गेम्स फेडरेशन ऑफ इंडियाचे कार्यकारी अधिकारी पार्थ दोशी यांचाही या उपक्रमात महत्त्वाचा सहभाग आहे. राष्ट्रीय व्हॉलीबॉल मार्गदर्शक राजेंद्र कोहाकडे यांनी कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन केले. या राष्ट्रीय स्पर्धेमुळे शिर्डीसह अहिल्यानगर जिल्ह्यातील युवा खेळाडूंना राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी मिळणार असल्याची भावना व्यक्त करण्यात आली. यावेळी उपकार्यकारी अधिकारी भिमराज दराडे, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, प्रशासकीय अधिकारी संदीपकुमार भोसले, अतुल वाघ, प्राचार्या स्वप्ना जगताप, मुख्याध्यापिका शिल्पा पुजारी, क्रीडा अधिकारी विशाल गर्जे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच चीन येथे झालेल्या शालेय जागतिक व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी भारतीय संघाचे सहाय्यक प्रशिक्षक म्हणून निवड झाल्याबद्दल गौरव अरविंद डेंगळे यांचा सत्कार करण्यात आला. राज्यातील इतर जिल्ह्यांनीही अशा सहविचार सभेचा आदर्श घ्यावा, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

# ममदापूर येथे चोरीचे सत्र थांबेना

## शेतकऱ्यांच्या मोटार पंप व केबलची चोरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**ममदापूर :** राहाता तालुक्यातील ममदापूर परिसरातील कळमकर मळा भागात प्रवरा डाव्या कालव्याच्या कडेला अज्ञात चोरट्यांनी शेतकऱ्यांच्या विहिरीवरील पाण्याचे मोटार पंप आणि वीजपुरवठ्याची केबल वायर लांबवल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. वारंवार घडणाऱ्या या चोऱ्यांमुळे आधीच संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, परिसरामध्ये भीती व संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ममदापूर परिसरातील गट नं. ४४४ मध्ये रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्यांनी विविध शेतांमध्ये प्रवेश केला. चोरट्यांनी विहिरीवरील विद्युत मोटार पंप आणि केबल वायर कापून तीळ लांबवली. सकाळी शेतकरी नेहमीप्रमाणे पिकांना व पिण्याच्या पाण्यासाठी मोटार चालू करण्यासाठी शेतात गेले, तेव्हा हा चोरीचा प्रकार त्यांच्या निदर्शनास आला. महागडे मोटार पंप आणि केबल वायर चोरीला गेल्यामुळे शेतकऱ्यांवर ऐन हंगामात मोठा आर्थिक भार पडला आहे. सिंचनाचा मुख्य स्त्रोतच धोक्यात आल्यामुळे शेतपिकांना पाणी देणे कठीण झाले असून, ऐन पिकांच्या वाढीच्या काळात उभ्या पिकांवर सुकण्याची वेळ आली आहे. परिसरात अशा घटना वारंवार घडत असल्याने शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे.

या घटनेची त्वरित माहिती लोणी पोलीस ठाण्याला देण्यात आली असून, पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला आहे. सध्या गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू असून पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

**राजुरी, ममदापूरमधील ही एकाच महिन्यातील तिसरी घटना असून लोणी पोलिसात गुन्हे ही दाखल आहेत. मात्र अद्याप चोरट्याचा सुगावा लागलेला नाही. यात भुरट्या चोरीचे सत्र अजूनही सुरूच आहे.**

**ग्रस्त वाढवावी ; मागणी**

सदरचे घटनेमुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी पोलिस प्रशासनाकडे तातडीने या प्रकरणाचा छडा लावून चोरट्यांना जेरबंद करावे, ग्रामीण भागात आणि शेतशिवारात रात्रीच्या वेळी पोलिसांची गस्त वाढवली. अशा प्रकारच्या चोऱ्या कायमच्या रोखण्यासाठी प्रभावी पावले उचलण्यात यावीत, जेणेकरून शेतकरी सुरक्षितपणे आपला शेती व्यवसाय करू शकतील.

## निधन वार्ता

### द्रौपदी काळे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** नगर तालुक्यातील देहरे येथील द्रौपदी रंगनाथ काळे (वय ६६) यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पती, मुलगी, दोन मुले, नातवंडे असा परिवार आहे. देहरे येथील किराणा व्यावसायिक संदीप व प्रदिप यांच्या त्या मातोश्री होत.

# शेतकरी कन्येची यशस्वी भरारी

## माजी विद्यार्थिनीची आयसीआयसीआय बँकेत शाखा व्यवस्थापकपदी निवड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**म्हैसगाव :** प्रसाद फाउंडेशन संचलित डॉ. सुभाष काकडे ज्युनिअर कॉलेज व केदारेश्वर माध्यमिक विद्यालय, म्हैसगाव येथील माजी विद्यार्थिनी कु. दिपाली बबन विधाटे हिची आयसीआयसीआय बँकेत शाखा व्यवस्थापक (ब्रँच मॅनेजर) पदावर निवड झाली आहे. शेतकरी कुटुंबातील दिपालीने जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या बळावर हे यश संपादन करत महाविद्यालयासह परिसराचा गौरव वाढविला आहे. तिच्या यशाबद्दल महाविद्यालयात दिपाली व तिच्या पालकांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना तिने सातत्यपूर्ण अभ्यास, वेळेचे नियोजन आणि मोबाईलचा सकारात्मक वापर केल्यास कोणतेही ध्येय गाठता येते, असा प्रेरणादायी संदेश दिला. यावेळी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुभाष बन्सी काकडे यांच्याप्रती तिने कृतज्ञता व्यक्त केली. या संस्थेमुळे




अनेक विद्यार्थी अभियांत्रिकी, वैद्यकीय, बँकिंग, भारतीय सैन्य, पोलीस दल तसेच विविध क्षेत्रांत यशस्वीपणे कार्यरत असल्याचे तिने नमूद केले. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुभाष काकडे, प्राचार्य तसेच शिक्षकवृंद उपस्थित होते. मान्यवरांनी दिपाली व तिच्या पालकांचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## मातेची थोरवी आणि कृतज्ञता जपण्यात मोठेपणा : ह.भ.प. कृष्णराज महाराज

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** आई -वडील यांचे उपकार कधीच फिटणारे नसतात. भारतीय संस्कृती आईवडिलांना दैवत मानते, त्यात मातेचा महिमा श्रेष्ठ आहे. तिची थोरवी व कृतज्ञता जपण्यातच मोठेपणा आहे, असे विचार साई विठ्ठल अनाथ विद्यार्थी वसतिगृहाचे संस्थापक, अध्यक्ष ह.भ.प. कृष्णानंद महाराज यांनी व्यक्त केले. श्रीरामपूर येथील अतिथी कॉलनीतील समाजमंदिर व्यासपीठावर ह.भ प. कृष्णानंद महाराज एका कार्यक्रमा प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य टी.ई. शेळके होते.डॉ. बाबुराव उपाध्ये यांनी मान्यवरांचा परिचय करून देऊन सर्वांना 'वाचता वाचता' पुस्तक भेट देऊन सर्वांचा सन्मान केला.संयोजक प्राचार्य सुभाष लिंगायत यांनी स्वागत, प्रास्ताविक केले.

यावेळी माजी प्राचार्य डॉ. शंकरराव गागरे, श्रीमती लिंगायत, माजी नायब तहसिलदार दत्तात्रय रायपल्ली यांनी व्यवहारे व लिंगायत परिवाराच्या सेवाभावी कार्याचा मोठेपणा असल्याचे सागितले.



## नावात बदल

मी माझे नाव शमशादबी सल्लाउद्दीन इनामदार वरून समशादबी अयाज शेख असे बदलत आहे. ही दोन्ही नावे एकाच व्यक्तीची असून इतर कोणत्याही व्यक्तीशी त्यांचा संबंध नाही.
प्रतिज्ञापत्र क्र
-२६५२२४२०४१२६८१००७०५७२८
दि ३१/०७/२०२६.

## CHANGE OF NAME

I HAVE CHANGED MY OLD NAME DEOKAR MAYUR VIJAYRAO (NAME AS PER SECONDARY SCHOOL CERTIFICATE No. 129798) TO NEW NAME AS MAYUR VIJAY DEOKAR VIDE AADHAR NO. 6870 0203 9806.


# पीक विमा प्रकरणात संगनमताचा आरोप

## दोषींवर कारवाईची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती कल्याण पाटील दांगोडे यांनी उपविभागीय अधिकारी, वैजापूर यांना निवेदन देऊन कृषी विभागाचे अधिकारी आणि पीक विमा कंपनी यांच्या संगनमताने तालुक्यातील पावसाची चुकीची आकडेवारी सादर करण्यात आल्याचा आरोप केला आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून संबंधित दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे.




निवेदनात म्हटले आहे की, अलीकडे प्रसिद्ध झालेल्या वृत्तानुसार वैजापूर तालुक्यात सरासरी १२९ टक्के पाऊस झाल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र प्रत्यक्ष परिस्थिती या आकडेवारीशी विसंगत असल्याचे दांगोडे यांनी म्हटले आहे. चुकीच्या पावसाच्या नोंदीमुळे तालुक्यातील शेतकऱ्यांना पीक विमा योजनेच्या लाभापासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न होत असल्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे.

तालुक्यातील सर्व पर्जन्यमापन केंद्रांवरील पावसाची नोंद नेमकी कोणत्या पद्धतीने करण्यात आली, याची संपूर्ण माहिती जाहीर करावी. तसेच मागील दोन महिन्यांतील पर्जन्यमापक यंत्रांचे छायाचित्र, व्हिडिओ आणि अधिकृत नोंदी सार्वजनिक कराव्यात, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. त्यामुळे प्रत्यक्ष पावसाचे चित्र स्पष्ट होईल, असे त्यांनी म्हटले आहे.

दांगोडे यांनी सांगितले की, तालुक्यातील अनेक गावांमध्ये समाधानकारक पाऊस झालेला नाही. अनेक तलाव, नाले, बंधारे आणि इतर जलस्रोत अद्यापही पूर्ण क्षमतेने भरलेले नाहीत. अशा परिस्थितीत १२९ टक्के पाऊस झाल्याचा दावा संशयास्पद वाटत आहे. चुकीच्या पावसाच्या आकडेवारीच्या आधारे विविध विकासकामांतील कथित भ्रष्टाचार झाकण्याचाही प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी केला.

या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून खरी आकडेवारी जाहीर करावी. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे. परभणी जिल्ह्यात अशाच प्रकारच्या प्रकरणात कृषी अधिकारी आणि पीक विमा कंपनीच्या संगनमताची चौकशी होऊन संबंधितांवर कारवाई करण्यात आली होती. त्याच धर्तीवर वैजापूर तालुक्यातील प्रकरणाचीही सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी कल्याण पाटील दांगोडे


सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

रविवार दि .२ ऑगस्ट २०२६

**मिलनम डे**

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १२० ३४६ ३३७ | ३-० | १९० २८० ४६० | जोड ३१-६०-२८-३५-०७ |

**कल्याण**

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १४० १५९ ११३ | ५-० | १९० ४६० ५५० | जोड ५२-६०-९१-७४-०८ |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| - | सुट्टी | - | जोड - |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 06/10/2025 to 10/10/2025 | 890 71 678 | 160 71 470 | 457 61 236 | 569 09 270 | 690 58 459 |
| 13/10/2025 to 17/10/2025 | 157 38 468 | 688 20 136 | 358 64 248 | 500 54 266 | 125 85 168 |
| 20/10/2025 to 24/10/2025 | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** |
| 27/10/2025 to 31/10/2025 | 190 06 150 | 457 64 167 | 247 36 330 | 490 32 156 | 130 48 170 |
| 03/11/2025 to 07/11/2025 | 127 04 266 | 259 63 256 | 799 52 679 | 244 00 389 | 490 32 138 |
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 15 249 | 348 50 136 | 158 42 390 | 257 41 245 | 126 90 677 |
| 22/06/2026 to 29/06/2026 | 366 21 245 | 118 04 158 | 689 33 779 | 168 55 249 | 579 19 289 |
| 29/06/2026 to 03/07/2026 | 144 95 249 | 127 04 789 | 257 47 269 | 157 34 266 | 255 22 679 |
| 06/07/2026 to 13/07/2026 | 558 84 356 | 120 36 790 | 237 21 470 | 150 60 136 | 277 69 144 |
| 13/07/2026 to 20/07/2026 | 130 41 155 | 680 47 368 | 128 18 350 | 379 90 136 | 150 63 300 |
| 20/07/2026 to 27/07/2026 | 360 9 | | | | |

## द•ख•ल

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त काँग्रेसकमिटीकडून अभिवादन



**अहिल्यानगर :** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शहर काँग्रेसच्या वतीने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दीप चव्हाण यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या सामाजिक, साहित्यिक व परिवर्तनवादी कार्याचा गौरव करत त्यांचे योगदान आजही समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. यावेळी बोलताना दीप चव्हाण म्हणाले की, भारताचे संविधान, सामाजिक समता आणि दलित चळवळीच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्य व शाहिरीच्या माध्यमातून मोठे समाजप्रबोधन केले. त्यांच्या लेखणीतून व शाहिरीतून वंचित, शोषित आणि कष्टकरी समाजाच्या वेदनांना प्रभावीपणे वाचा मिळाली. अहिल्यानगर शहराशी त्यांचे विशेष नाते होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'थॉट्स ऑन पाकिस्तान' हा महत्त्वपूर्ण ग्रंथ नगरमध्ये लिहिला, तसेच अण्णाभाऊ साठे यांनीही नगरमध्ये मोठ्या प्रमाणात साहित्य निर्मिती केली. त्यांच्या शाहिरीचा आस्वाद नगरकरांना लाभला, ही शहरासाठी अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. या अभिवादन कार्यक्रमास दीप चव्हाण, फिरोज खान, संजय घुले, अभिजीत कांबळे, राजेंद्र कर्डिले, प्रा. शामराव वाघस्कर, अभिनव गायकवाड, प्रा. रवी सातपुते, चंद्रकांत भंडारी, दिलीप घुले, विक्रम क्षीरसागर, अजित कटारिया, यश चव्हाण यांच्यासह काँग्रेस पक्षाचे सर्व फ्रंटल सेलचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## मनपा सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेच्या कार्याध्यक्षपदी देशमुख

**अहिल्यानगर :** येथील महानगरपालिका सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेच्या कार्याध्यक्षपदी दिनकर देशमुख यांची निवड करण्यात आली.



महानगरपालिका व नगरपालिका सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेची सभा कास्ट्राईब संघटनेच्या कार्यालयात संघटनेची बैठक नुकतीच होऊन यामध्ये दिनकरराव देशमुख यांची निवड एकमताने करण्यात आली. संघटनेचे अध्यक्ष एन. एम. पवळे, उपाध्यक्ष वसंत थोरात, उपाध्यक्ष मिलिंद वैद्य, चिटणीस आर. के. गावडे, खजिनदार डी. एम. डेपाळ यांच्यासह संस्थेचे सर्व कार्यकारिणी सदस्य या बैठकीस उपस्थित होते.

## ध्वनी प्रदूषण विरहित दिंडीत रंगले वि.ल.कुलकर्णी शाळेचे बाल वारकरी



**अहिल्यानगर :** आषाढी एकादशीनिमित्त वि. ल.कुलकर्णी प्राथमिक शाळेत भक्तिमय वातावरणात दिंडीचे आयोजन करण्यात आले. वारकरी वेशातील विद्यार्थ्यांनी टाळ,भगवे ध्वज, तुळशीची रोपे हातात घेऊन 'माऊली, माऊली,'विठ्ठल विठ्ठल, जय हरी विठ्ठल' च्या गजरात शाळेच्या परिसरातून दिंडी काढली. विद्यार्थ्यांच्या वारकरी नृत्यातून, शिक्षकांनी गायलेल्या अभंगातून हरिनामाचा गजर करत समाजात श्रद्धा, भक्ती आणि एकतेचा संदेश देत बाल वारकरी उत्साहात दिंडीत पायी वाट चालत होते. विठ्ठल रखुमाई, ज्ञानेश्वर माऊली, संत तुकाराम, मुक्ताबाई, संत नामदेव यांच्या वेशभूषेत असलेल्या विद्यार्थ्यांमुळे सोहळा आणखीनच नयनरम्य झाला. आषाढ सरींची पर्वा न करता या दिंडीत शाळेच्या मुख्याध्यापिका भारदे तसेच सर्व शिक्षक यांच्यासह संस्थेचे सर्व मान्यवर पदाधिकारी रेखे मॅडम, चंद्रशेखर कुलकर्णी, किरण वैकर, उमेशजी रेखे, महेशजी रेखे, उदयकुमार भणगे यांनी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला.

## समर्थ दासबोध ए.आय. जगाच्या पाठीवर संत वाङ्मयातील क्रांतिकारी घटना

**अहिल्यानगर :** दासबोध सखोल अभ्यास फाउंडेशन परिवारातील अमेरिकेत राहत असलेले सौ. अवनी आणि श्री. ओंकार सबनीस यांनी विश्वाच्या पाठीवर रामदास स्वामींच्या दासबोध ग्रंथातील ए आय हे व्यासपीठ तयार केले, त्याचे आज गुरुपौर्णिमेच्या मुहूर्तावर लोकार्पण झाले.



समर्थ रामदास स्वामींच्या दासबोध ग्रंथातील व्यवहार, परमार्थ, प्रयत्नवाद, संघटन कौशल्य, लेखन, वक्तृत्व, अर्थव्यवस्थापन अशा अनेक विषयांवर प्रश्न विचारले असता दासबोधातील ओव्या आणि त्यांचा इंग्रजी तसेच मराठी अर्थ उपलब्ध होतो. दासबोध ए आय ही जगातल्या तरुण पिढीसाठी एक मोठी उपलब्धी आहे असे विचार दासबोध सखोल अभ्यास फाउंडेशनचे संचालक डॉ. विजय लाड यांनी या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी व्यक्त केले.

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादीकडून अभिवादन



**अहिल्यानगर :** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांच्या साहित्यिक, सामाजिक आणि परिवर्तनवादी कार्याला उजाळा देत त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या अभिवादन कार्यक्रमास संपत बारस्कर यांच्यासह अजय दिघे, दीपक खेडकर, सुरज शिंदे, ऋषिकेश रासकर, तुषार यादव, राहुल कातोरे, आकाश बारस्कर, प्रा. भगवान काटे, सारंग पंधाडे, परेश पुरोहित, नितीन घोडके, आनंद राठोड, जालिंदर वाल्हेकर, राहुल शिंदे, मुसला धनगर, योगेश एरंडे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

# डेंगू आजारावर प्रतिबंधात्मक उपाययोजनाच प्रभावी : सभापती बारस्कर

## प्रत्येक शनिवारी घरोघरी जाऊन पाणीसाठ्यांची तपासणी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** महानगरपालिका आणि आरोग्य विभागाच्या संयुक्त विद्यमाने श्रमिकनगर येथे 'डेंगूमुक्त अहिल्यानगर अभियानाचा' शुभारंभ महिला व बालकल्याण समितीच्या सभापती दिपाली बारस्कर यांच्या हस्ते करण्यात आला. अभियानांतर्गत परिसरातील पाणीसाठ्यांची तपासणी करण्यात आली तसेच नागरिकांमध्ये डेंगू प्रतिबंधाबाबत जनजागृती करण्यात आली.

यावेळी बोलताना सभापती दिपालीताई बारस्कर म्हणाल्या की, आरोग्य हीच माणसाची खरी संपत्ती आहे. धकाधकीच्या जीवनात अनेकजण स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि स्वच्छतेच्या सवयी अंगीकारल्यास अनेक आजारांपासून बचाव होऊ शकतो. विद्यार्थ्यांनी मैदानी खेळांकडे वळून शारीरिक तंदुरुस्ती राखावी, असे आवाहन त्यांनी केले.

त्या पुढे म्हणाल्या की, डेंगू हा अत्यंत जीवघेणा आजार असून त्यावर उपचारापेक्षा प्रतिबंध अधिक महत्त्वाचा आहे. प्रत्येक नागरिकाने आपल्या घरापासून आणि परिसरापासून स्वच्छतेची सुरुवात करून साचलेले पाणी तातडीने नष्ट करावे. एडिस डासांची उत्पत्ती होणार नाही, यासाठी नागरिकांचा सहभाग अत्यावश्यक आहे. महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या संकल्पनेतून दोन वर्षांपूर्वी सुरू करण्यात आलेल्या डेंगूमुक्त अहिल्यानगर अभियानामुळे शहरातील डेंगू रुग्णसंख्येत मोठी घट झाल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमास बाळासाहेब पवार, नगरसेवक मनोज दुल्हम, नगरसेवक करण कराळे, पुष्कर कुलकर्णी, नगरसेविका रोशनी त्रिंबके, डॉ. सतीश राजूरकर, डॉ. धनंजय वारे, डॉ. पद्मा कुलकर्णी, विद्या एकलदेवी, श्याम पंगा, रोशनी सूर्यवंशी, शशिकांत गोरे, सोनाली मेहत्रे, डॉ. वृषाली आरु, डॉ. आरती ढापसे, आरोग्य सेविका, आशा सेविका, विद्यार्थी, पालक



व कर्मचारी उपस्थित होते.

नगरसेवक करण कराळे म्हणाले की, महापालिकेने सुरू केलेले डेंगूमुक्त अहिल्यानगर अभियान हे आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत कौतुकास्पद आहे. डासांची संख्या नियंत्रणात ठेवण्यासाठी फवारणी, पाणीसाठ्यांची तपासणी आणि आरोग्यविषयक जनजागृती अधिक व्यापक स्वरूपात राबवावी. डेंगूची लक्षणे दिसताच तातडीने उपचार घेतल्यास रुग्ण लवकर बरा होऊ शकतो. नागरिकांनी स्वतःची आणि परिसराची स्वच्छता राखून या अभियानात सक्रिय सहभाग घ्यावा, असे त्यांनी आवाहन केले.

यावेळी बाळासाहेब पवार, डॉ. धनंजय वारे, डॉ. पद्मा कुलकर्णी आणि रोशनी सूर्यवंशी यांनीही आरोग्याची काळजी, स्वच्छता आणि डेंगू प्रतिबंधक उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले.

अभियानादरम्यान आशा सेविका तसेच डॉ. एन. जी. पाऊलबुद्धे फार्मसी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर करून डेंगूविषयी प्रभावी जनजागृती केली. तसेच मार्कंडे शाळेची विद्यार्थिनी समीक्षा मुद्दयाल हिने भारतातील पहिल्या महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी यांच्या वेशभूषेत डेंगू प्रतिबंधाबाबत नागरिकांना संदेश दिला.

डॉ. वृषाली आरु यांनी सांगितले की, डेंगू हा एडिस इजिप्ती डासामुळे पसरणारा विषाणूजन्य आजार आहे. हा डास प्रामुख्याने दिवसा चावतो. त्यामुळे घरात किंवा परिसरात पाणी साचू देऊ नये. पाण्याची भांडी कायम झाकून ठेवावीत, आठवड्यातून एक दिवस 'कोरडा दिवस' पाळावा, कुलर, फ्रीज फुलदाण्या, टाक्या यांतील पाणी दर दोन ते तीन दिवसांनी बदलावे.

डेंगूची प्रमुख लक्षणे म्हणजे ताप, तीव्र डोकेदुखी, डोळ्यांमध्ये वेदना, सांधे व स्नायू दुखणे, अंगावर लालसर पुरळ येणे, उलट्या, पोटदुखी तसेच गंभीर अवस्थेत उलटी किंवा लघवीतून रक्तस्राव होणे. अशी लक्षणे आढळल्यास तात्काळ महापालिका किंवा शासकीय रुग्णालयात जाऊन वैद्यकीय उपचार घ्यावेत, असे आवाहन त्यांनी केले.

## अण्णाभाऊ साठे व वीर लहुजी वस्ताद साळवे यांचे पूर्णाकृती पुतळे उभारणार : आ. जगताप

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त सिद्धार्थ नगर येथील अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास आ. संग्राम जगताप यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना आ. संग्राम जगताप म्हणाले की, महाराष्ट्राच्या मातीत जन्मलेल्या महापुरुषांनी केवळ राज्यालाच नव्हे तर संपूर्ण देशाला दिशा देण्याचे कार्य केले आहे. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्य व शाहिरीच्या माध्यमातून समाजप्रबोधनाची चळवळ उभी केली. त्यांनी ग्रामीण भागापासून शहरांपर्यंत सर्वसामान्यांमध्ये सामाजिक जागृती निर्माण केली आणि अन्यायाविरोधात आवाज



बुलंद केला. ते पुढे म्हणाले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा संदेश आजही तितकाच प्रेरणादायी आहे. शिक्षण हे प्रत्येक व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाचे प्रभावी साधन असून ज्ञानाच्या बळावर व्यक्ती स्वतःच्या पायावर उभी राहून समाजालाही योग्य दिशा देऊ शकते. महापुरुषांचे विचार समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

अहिल्यानगर शहरात महापुरुषांच्या विचारांचा वारसा जपत विकासालाही गती मिळत असल्याचे सांगत, समाजबांधवांशी चर्चा करून जागा निश्चित करण्यात येणार असून प्रशासनाची आवश्यक परवानगी व ठराव पूर्ण झाल्यानंतर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि वीर लहुजी वस्ताद साळवे यांचे पूर्णाकृती पुतळे अहिल्यानगरात उभारण्यात येतील, अशी घोषणा आ. संग्राम जगताप यांनी केली.

## अण्णाभाऊ साठे हे वंचितांच्या संघर्षाचा बुलंद आवाज : शिंदे

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त सिद्धार्थनगर येथील त्यांच्या पुतळ्यास आईसाहेब बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमात समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचा गौरव केला. यावेळी परिसर 'लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या घोषणांनी दुमदुमून गेला.

कार्यक्रमात सुनील शिंदे यांच्या हस्ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आले. उपस्थितांनी फुले अर्पण करून त्यांच्या सामाजिक, साहित्यिक आणि परिवर्तनवादी कार्याला अभिवादन केले. यावेळी प्रेम गाडे, सुनील उमाप, जयवंत गायकवाड, सतीश बोरुडे, आनंद बोरुडे, शासनाचा पुरस्कार प्राप्त डॉ. सुनील सकट, अभिषेक बोरुडे, अतुल जगधने, परशुराम शिंदे, महादेव नेटके यांच्यासह समाजबांधव उपस्थित होते.

अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून समाजातील शोषित, वंचित, कष्टकरी आणि कामगार वर्गाच्या वेदना, संघर्ष आणि स्वाभिमानाला आवाज दिला. त्यांच्या विचारांचा वारसा समाजासाठी आजही प्रेरणादायी असल्याचे यावेळी उपस्थितांनी नमूद केले. यावेळी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीला राज्य शासनाने शासकीय सुट्टी जाहीर करावी, त्यांना मरणोत्तर 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान करावा तसेच मागासवर्गीयांच्या आरक्षण वर्गवारीची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी मागणी उपस्थितांनी केली. सुनील शिंदे म्हणाले की, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या प्रभावी लेखणीच्या माध्यमातून समाजात परिवर्तनाची नवी चेतना निर्माण केली. दलित, शोषित, कामगार आणि वंचित घटकांचे जीवन, त्यांचे संघर्ष, वेदना आणि स्वप्ने त्यांनी आपल्या साहित्यामधून जिवंत केली. त्यांचे साहित्य हे केवळ साहित्यिक ठेवा नसून सामाजिक क्रांतीचा दस्तऐवज आहे. अण्णाभाऊ साठे यांचा सन्मान म्हणजे समाजातील कष्टकरी, वंचित आणि उपेक्षित घटकांचा सन्मान असल्याचे त्यांनी सांगितले.

## गुन्हेगारी रोखण्यासाठी पोलिस पाटील व कोतवाल महत्त्वाचा दुवा : पो.नि.ढोकरे

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** शहरातील श्री अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळाच्या वतीने जागतिक मानव तस्करी विरोधी दिनानिमित्त संगमनेर येथील उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयात पोलिस पाटील व कोतवाल यांच्यासाठी कायदेविषयक मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेत १२५ हून अधिक पोलिस पाटील व कोतवाल सहभागी झाले.

यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक विकास ढोकरे यांनी सांगितले की, मानवी तस्करी, वेठबिगारी व बालमजुरी ही गंभीर सामाजिक आव्हाने असून, त्यांना आळा घालण्यासाठी गावपातळीवर



सतर्कता आणि जनजागृती अत्यंत आवश्यक आहे. पोलिस पाटील व कोतवाल हे प्रशासन आणि गावकऱ्यांमधील महत्त्वाचा दुवा असून, त्यांच्या सतर्कतेमुळे अनेक गुन्हे रोखण्यास मदत होऊ शकते. वेठबिगार पद्धतीचे उच्चाटन अधिनियम, १९७६ याबाबत गावागावात जनजागृती करण्याचे कार्य सामाजिक संस्थांकडून होत असल्याबद्दल त्यांनी कौतुक व्यक्त केले. कार्यशाळेत गोरख जाधव यांनी वेठबिगारी, बालमजुरी व मानवी तस्करीसंदर्भातील कायदे, पीडितांचे संरक्षण, बचावकार्य व पुनर्वसन याबाबत मार्गदर्शन केले. संस्थेचे जिल्हा समन्वयक सिराज शेख यांनी सांगितले की, श्री अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळ गेल्या चार वर्षांपासून अहिल्यानगर, पुणे व नाशिक जिल्ह्यांत वेठबिगारी निर्मूलनासाठी कार्यरत असून, संस्थेच्या माध्यमातून आतापर्यंत २०० हून अधिक वेठबिगारांची सुटका करून त्यांचे पुनर्वसन करण्यात आले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमास बाळासाहेब मधुकर यादव, गोरख जाधव व निलेश छडीदार उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन संस्थापक दिलीप गुंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी दत्ता मेंगळ, आंबादास गुंजाळ, मंगेश थोरात, गोरख धात्रक, सागर विटकर, मयुरी वनवे व संदीप काळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## थोर समाज सुधारकांचे योगदान प्रेरणादायी : डॉ. ठाकूर



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** स्वातंत्र्यपूर्व काळात अतिशय प्रतिकूल सामाजिक परिस्थितीत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी अनुभवातून लिहिलेले प्रबोधनात्मक साहित्य तसेच लोकमान्य टिळक यांचे सामाजिक ऐक्य आणि देशप्रेम जागृत करणारे कृतीयुक्त विचार व साहित्य आजही समाजाला प्रेरणादायी असल्याचे उदगार जिल्हा वाचनालयचे अध्यक्ष डॉ. राजा ठाकूर यांनी काढले. जिल्हा वाचनालयात अण्णाभाऊ साठे जयंती आणि लोकमान्य टिळक पुण्यतिथी निमित्त आयोजित पुस्तक प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी संजय चोपडा, विक्रम राठोड, शिल्पा रसाळ, किरण अग्रवाल अमोल इतापे, नितीन भारताला, पल्लवी कुकडवाल, वर्षा जोशी, संजय गाडेकर, आशिष तरोटे, ओम केदारे तसेच वाचक कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिल्पा रसाळ यांनी केले. संचालक संजय चोपडा यांनी या उपक्रमानिमित्त वाचकांना साहित्याचे वितरण केले. आभार ग्रंथपाल अमोल इतापे यांनी मानले.

# सारोळा कासार, खडकी परिसरात महिलांच्या दागिन्यांची लुट

## दोन दिवसांत चौथी घटना, महिलांमध्ये भीतीचे वातावरण

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** शेतात काम करणाऱ्या किंवा रस्त्याने चाललेल्या महिलांना मारहाण करत त्यांचे दागिने लुटण्याचे सत्र नगर तालुक्यातील सारोळा कासार व खडकी गावच्या परिसरात सुरु झाले आहे. विना क्रमांकाच्या दुचाकीवर हे अनोळखी चोरटे येतात महिलांना मारहाण करत त्यांच्या गळ्यातील, कानातील दागिने ओरबाडतात आणि पुन्हा भरधाव वेगात निघून जातात. गेल्या २ -३ दिवसात अशा ४ घटना घडल्या आहेत. त्यामुळे या परिसरात महिलावर्गात प्रचंड भीतीचे वातावरण पसरले आहे.

१ ऑगस्ट रोजी सकाळी खडकी येथील रोकडे मळा परिसरात गावचे उपसरपंच नवनाथ रोकडे यांच्या पत्नी स्वाती या शेतात जनावरांना चाऱ्यासाठी कडवळ आणायला चाललेल्या असताना दुचाकीवर आलेल्या चोरट्यांनी त्यांना अडवले. त्यांना मारहाण करत त्यांच्या गळ्यातील व कानातील दागिने ओरबाडून चोरटे पसार झाले. या अचानक झालेल्या हल्ल्याने घाबरलेल्या स्वाती यांच्या वर सारोळा कासार येथे प्राथमिक उपचार करण्यात आले.

दोन दिवसांपूर्वी खडकी शिवारातच अकोळनेर-खडकी रस्त्यावर असलेल्या शेतात काम करून सायंकाळी घराकडे परतणाऱ्या सोमनाथ नामदेव कोठुळे यांच्या आई आणि बहिण



यांना तीन अनोळखी इसमांनी गाठले आणि जबरदस्तीने त्यांच्याकडील सोन्याचे दागिने हिसकावून पोबारा केला.

या लुटमारीमध्ये चोरट्यांनी १ ग्रॅम वजनाचे सोन्याचे कुडके, ३ ग्रॅम वजनाचे टॉप्स, ४ ग्रॅम वजनाची सोन्याची पोत आणि २ ग्रॅम वजनाची कर्णफुले असा एकूण ११ ग्रॅम वजनाचा ऐवज बळजबरीने लांबवला. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

३० जुलै रोजी सायंकाळी सारोळा कासार गावच्या रेल्वे स्टेशन परिसरात आशाबाई लिंबोरे यांना ही दुचाकीवर आलेल्या अनोळखी चोरट्यांनी रस्त्यात अडवून मारहाण करत त्यांचे दागिने लुटले होते. तर सारोळा खडकी रस्त्यावर जुना सारोळा ते पठार या दरम्यान सोनाली प्रवीण कांबळे या महिलेलाही अशाच प्रकारे मारहाण करत लुटल्याची घटना घडली होती. गेल्या २ -३ दिवसांत ४ घटना घडल्याने नागरिकांमध्ये विशेषतः महिला वर्गात प्रचंड भीतीचे वातावरण पसरले आहे.

घटनेची माहिती मिळताच माजी जिल्हा परिषद सदस्य संदेश कार्ले यांनी तात्काळ नगर ग्रामीणचे पोलीस उपअधीक्षक शिरीष वमने, स्थानिक गुन्हे शाखा व नगर तालुका पोलिसांना घटनेची माहिती दिली. तसेच त्यांच्यासह गावातील अनेक युवक व ग्रामस्थांनी रोकडे मळ्या पासून थेट जाधववाडी पर्यंत चोरट्यांची शोध मोहीम राबविली. उपअधीक्षक वमने, स्थानिक गुन्हे शाखेचे पथक, नगर तालुका पोलीस ठाण्याचे स.पो.नि. गणेश वारुळे यांनी पथकासह घटनास्थळी भेट दिली. यावेळी कार्ले यांनी परिसरात फिरणाऱ्या बिगर नंबरच्या दुचाकी - चार चाकी वाहनांवर पोलिसांनी धडक मोहीम राबवत कारवाई सुरु करावी अशी मागणी केली.

# महाराजस्व समाधान शिबीर अभियानात दीड हजार लाभार्थ्यांना लाभ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** राज्य शासनाच्या महसूल विभागाच्या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त व दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त व १ ऑगस्ट रोजी होणाऱ्या महसूल दिनाचे औचित्य साधून अप्पर तहसील कार्यालय लोणी काळभोर तालुका हवेली यांच्या कार्यक्षेत्रामध्ये श्री क्षेत्र थेऊर येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबाराचे उद्घाटन शिरूर हवेली विधानसभा मतदारसंघाचे आमदार ज्ञानेश्वर आबा कटके आणि जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिरात एकूण १० स्टॉलच्या माध्यमातून १ हजार ४६५ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला.

यावेळी हवेली उपविभागाचे उपविभागीय अधिकारी डॉ.यशवंत माने, रजा राखीव उपजिल्हाधिकारी नामदेव टिळेकर , उपविभागीय अधिकारी भोर डॉ. खरात तसेच पंचायत समिती हवेलीचे सभापती युवराज काकडे, उपसभापती विद्या गायकवाड आणि तालुक्यातील शासकीय विभागातील कार्यालय प्रमुख व पंचायत समिती



सभापती, उपसभापती व जिल्हा व पंचायत समिती सदस्य आदी उपस्थित होते.

तहसील कार्यालयातील संजय गांधी विभाग, पुरवठा विभाग, सेतू कार्यालय व महसूल विभाग उपस्थित होता. तसेच तालुक्यातील सर्व गावांचे ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी उपस्थित होते. पंचायत समिती, तालुका कृषी कार्यालय महावितरण विभाग, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प घोडेगांव, भूमी अभिलेख कार्यालय, वन विभाग, पीएमआरडीए व इतर उपस्थित होते.

अनुसूचित जमातीतील समाजातील १३४ नागरिकांना जातीचा दाखल्यांचे वितरण :

शिबिरात विशेषतः अनुसूचित जमातीतील भिल्ल आणि फासेपारधी समाजातील १३४ नागरिकांना जातीचा दाखल्यांचे वितरण करण्यात आले. आजपर्यंत अपर तहसील कार्यालय लोणी काळभोर यांच्यावतीने अनुसूचित जाती जमातीच्या नागरिकांकरिता सात शिबाराचे आयोजन करून दीड हजार राहून अधिक जातीच्या दाखल्यांचे वाटप करण्यात आले. याबाबत आदिवासी सामाजिक कार्यकर्ते श्री नामदेव भोसले यांनी याबाबत समाधान व्यक्त केले व प्रशासनाचे आभार मानले.

श्री. डुडी यांच्या संकल्पनेतून १ ऑगस्ट रोजी महसूल दिन साजरा करताना जिल्ह्यामधील उत्कृष्ट काम करणाऱ्या महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान त्यांना प्रशस्तीपत्रक व ट्रॉफी देऊन करण्यात आला.पुणे जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी कल्याण पांढरे, तहसीलदार राजेंद्र नजन व इतर अधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या निमित्ताने पुणे शहराच्या आजूबाजूच्या भागातील रस्त्यांचे जाळे मजबूत करण्यासाठी आवश्यक निधी जिल्हा नियोजनाकडून तात्काळ देण्यात येईल, असे आश्वासन माननीय जिल्हाधिकारी श्री. डुडी यांनी दिले.

या शिबिराच्या माध्यमातून नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ मिळाला. यामध्ये वृद्धापकाळ, विधवा, दिव्यांग योजना, उत्पन्न दाखले, जात प्रमाणपत्र, आधार लिंक आदी विविध सेवांचा समावेश होता.नागरिकांना विविध योजनांची माहिती देण्यात आली, नागरिकांनी शिबिरास उत्तम प्रतिसाद दिला.

## दानशूरतेतून विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना नवे पंख

### युवा उद्योजक अमोल पुंडे यांच्याकडून गरजू विद्यार्थ्यांना मोफत सायकली; कान्हूर मेसाईतील उपक्रमाचे कौतुक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पाबळ :** शिक्षणासाठी आर्थिक अडचणींशी झुंज देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहत कान्हूर मेसाई येथील युवा उद्योजक व समाजसेवक अमोल रामदास पुंडे यांनी विद्याधाम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील गरजू विद्यार्थी-विद्यार्थिनींना मोफत सायकलींचे वाटप केले. या उपक्रमामुळे अनेक विद्यार्थ्यांचा शाळेचा प्रवास सुलभ होणार असून, परिसरात त्यांच्या दातृत्वपूर्ण कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच बापूसाहेब ननवरे होते. यावेळी माजी सरपंच शिवराम पुंडे, माजी चेअरमन भाऊसाहेब तळोले, सरपंच कोंडीभाऊ पुंडे, बंडू पुंडे, मोहन पुंडे, दीपक तळोले, पोलीस अधिकारी विठ्ठलराव खर्डे, समाजसेवक शहाजी दळवी, लहू तळोले, अमोल द. पुंडे, रमेश खर्डे, पोपटराव तळोले, आबा शिंदे, निखिल पुंडे, अजित पुंडे, संग्राम ननवरे, राजेंद्र गावडे, अतुल गावडे, प्रतीक दाते, ओम आदक, निलेश ननवरे, अक्षय ननवरे, विद्यालयाचे पर्यवेक्षक मनोज धुमाळ, रामदास कुलट, संतोष पुंडे, आकाश भोकनळ, अविनाश भोकनळ यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांनी शिक्षणासाठी समाजातील दानशूर व्यक्तींनी पुढाकार घेण्याची गरज व्यक्त केली. गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देणे हीच खरी समाजसेवा असल्याचे त्यांनी सांगितले.

सायकल मिळालेल्या विद्यार्थिनी साईशा गायकवाड हिने, ही सायकल माझ्या शिक्षणाच्या वाटचालीला नवे बळ देणारी ठरेल, अशी भावना व्यक्त करत अमोल पुंडे यांचे आभार मानले.यावेळी विद्यालयाच्या वतीने अमोल रामदास पुंडे यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. प्राचार्य विनोद शिंदे यांनी आभार मानले, तर प्रकाश चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले.

## बिरजू मांढरे यांच्या वतीने अण्णाभाऊ साठे जयंती साजरी..!



**अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त नगराध्यक्ष सचिन सातव यांचा सत्कार करताना बिरजू मांढरे व इतर**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बारामती:** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी दिलेले लेखणीतून योगदान आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी व्हावे या उदेशयाने बारामती नगरपरिषद चे मा. उपनगराध्यक्ष व विद्यमान नगरसेवक बिरजू मांढरे व नगरसेविका प्रतिभा विजय खरात यांच्या संयुक्त विद्यमानाणे सुरू केलेला लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती महोत्सव उत्साहात संपन्न झाला.या प्रसंगी बारामती नगरपरिषद चे नगराध्यक्ष सचिन सातव, उपनगराध्यक्षा श्वेता नाळे, ज्येष्ठ नेते किरण गुजर ,सर्व नगरसेवक नगरसेविका व बहुजन समाज पार्टीचे सचिव काळूराम चौधरी, एमआयडीसी चे प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील सर्व पक्ष्याचे प्रतिनिधी व मातंग एकता आंदोलन चे पदाधिकारी उपस्तीत होते.रशियात शिवाजी महाराज यांचा पोवाडा सादर करणारे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे या विषयावर प्रा मनोज वाबळे यांचे व्याख्यान संपन्न झाले. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्याचा सत्कार आदी कार्यक्रम संपन्न झाले. सचिन सातव, काळूराम चौधरी, जय पाटील, शुभम अहिवळे,जालिंदर सोनवणे आदींनी मनोगत व्यक्त केले.स्व अजित दादा पवार यांचा निधनाचा दुखवटा असल्याने जयंती मोठ्या स्वरूपात न करता व्याख्यान,वृक्षारोपण व शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती संपन्न करत असल्याचे आयोजक बिरजू मांढरे यांनी सांगितले.डॉ, बाबासाहेब आंबेडकर वसाहत रहिवासी संघ,साईच्छा सेवा ट्रस्ट,श्रीहरी भाऊ तेलंगे मित्र परिवार, भाऊसाहेब मांढरे सामाजिक संस्था, लहुजी वस्ताद दहीहंडी मंडळ,च्या कार्यकर्त्यांनी सदर कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले.

## जेजुरीत विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा व व्यसनमुक्तीचे धडे

मयुर कुदळे । राष्ट्र सह्याद्री

**जेजुरी :** जेजुरी येथील जिजामाता हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज मध्ये पुणे ग्रामीण पोलीस व जेजुरी पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर सुरक्षा व अमली पदार्थविरोधी जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेजुरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी सायबर गुन्हे, ऑनलाइन फसवणूक, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर आणि अमली पदार्थांच्या दुष्परिणामांविषयी माहिती देत, सायबर गुन्हे आणि अमली पदार्थांपासून दूर राहा; सजग, जबाबदार नागरिक बना, असे आवाहन केले. तसेच कायद्याचे पालन करणारे आणि समाजाप्रती उत्तरदायी नागरिक बनण्याचे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे प्राचार्य नंदकुमार सागर यांनी केले. सहायक पोलीस निरीक्षक दिपाली पवार, पोलीस अधिकारी नामदेव तारडे आणि पोलीस हवालदार विनोद देशमुख यांनी यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा व व्यसनमुक्तीबाबत मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांनी अमली पदार्थांना कायमचा नकार देण्याची सामूहिक प्रतिज्ञा घेतली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सागर चव्हाण यांनी, तर आभार डॉ. मधुसूदन जगताप यांनी मानले. कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन जेजुरी पोलीस स्टेशनचे भूषण कदम व विद्यालयातील शिक्षकांनी केले.

## पुण्यात पॅनेलवरील मध्यस्थांसाठी दोन दिवसीय प्रशिक्षण संपन्न

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई तसेच मुख्य मध्यस्थी केंद्र, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे यांच्या समन्वयाने पॅनेलवरील मध्यस्थांसाठी दोन दिवसीय अभिमुखता व प्रशिक्षण कार्यक्रमाचे २४ व २५ जुलै रोजी हॉटेल अरोरा टॉवर्स, पुणे येथे करण्यात आले. यावेळी पुणे जिल्ह्यातील २७५ पॅनेलवरील मध्यस्थ सहभागी झाले.



कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष श्री. ए. टी. वानखेडे यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाचे सदस्य सचिव तथा मुख्य मध्यस्थी केंद्राचे संचालक/समन्वयक मा. एस. सलमान आझमी उपस्थित होते. यावेळी मुख्य मध्यस्थी केंद्राचे उपसंचालक प्रवीण ए. कुंभोजकर तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव रेवती आर. देशपांडे उपस्थित होत्या. प्रशिक्षणादरम्यान मध्यस्थी अधिनियम, २०२३, प्रभावी संवाद, ऑनलाइन वाद निवारण (जूठ), मानसिक आरोग्य आणि मध्यस्थी, समुपदेशन, मध्यस्थांची भूमिका, संघर्ष समजून घेणे आणि मध्यस्थीची संकल्पना आदी विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

न्यायालयांतील प्रलंबित प्रकरणे कमी करण्यासाठी आणि पर्यायी वाद निवारण प्रणाली अधिक सक्षम करण्यासाठी प्रशिक्षित मध्यस्थांची भूमिका महत्त्वाची असल्याचे वक्त्यांनी अधोरेखित केले.दुसऱ्या दिवशी सहभागी मध्यस्थांसाठी प्रश्नोत्तर व शंका-समाधान सत्राचे आयोजन करण्यात आले. यामध्ये मध्यस्थांनी प्रत्यक्ष कामकाजातील अनुभव, अडचणी आणि प्रक्रियेसंदर्भातील प्रश्न उपस्थित केले. तज्ज्ञांनी त्यावर सविस्तर मार्गदर्शन करून प्रभावी मध्यस्थीसाठी आवश्यक कौशल्यांवर भर दिला.

## विशेष लोकअदालतीत २०१ प्रकरणे सामोपचाराने निकाली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशानुसार तसेच प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे श्री. ए. टी. वानखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा न्यायालय, पुणे येथे परक्राम्य लिखत अधिनियम, १८८१ च्या कलम १३८ अंतर्गत दाखल प्रकरणांच्या तडजोडीसाठी विशेष लोकअदालतीचे नुकतेच यशस्वी



आयोजन करण्यात आले.

या विशेष लोकअदालतीसाठी एकूण १५ लोकअदालती पॅनेल (बेंच) स्थापन करण्यात आले होते.

लोकअदालतीमध्ये ३ हजार ७४२ प्रलंबित प्रकरणे सुनावणीस घेण्यात आली. त्यापैकी २०१ प्रकरणे सामोपचाराने निकाली काढण्यात आली.

निकाली निघालेल्या प्रकरणांमधील एकूण दावा रक्कम ५ कोटी ६६ लाख ८६ हजार ४६३ रुपये इतकी होती. तडजोडीद्वारे ५ कोटी ७५ लाख ३१ हजार ६८० रुपये इतक्या रकमेवर समझोता करण्यात आला.विशेष लोकअदालतीच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व न्यायिक अधिकारी, लोकअदालत पॅनेल सदस्य, अधिवक्ता, न्यायालयीन कर्मचारी तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

परक्राम्य लिखत अधिनियम, १८८१ च्या कलम १३८ अंतर्गत पुढील विशेष लोकअदालत २१ नोव्हेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार असून, या लोकअदालतीचा जास्तीत जास्त पक्षकारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव रेवती रा. देशपांडे यांनी केले आहे.

# लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांना प्रदान

### लोकमान्य टिळकांचे विचार आजही राष्ट्राला दिशा देणारे; अजित डोवाल यांचे राष्ट्रसेवेतील योगदान प्रेरणादायी – केंद्रीय गृहमंत्री अमित शाह

### अजित डोवाल यांचा सन्मान हा राष्ट्रसेवा, राष्ट्रवाद आणि समर्पणाचा गौरव-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्याला नवी दिशा देत राष्ट्रवाद, शिक्षण, पत्रकारिता आणि सामाजिक जागृतीचा भक्कम पाया रचला. स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच हा त्यांचा विचार आजही प्रत्येक भारतीयाला प्रेरणा देत असून विकसित आणि सक्षम भारताच्या निर्मितीसाठी मार्गदर्शक ठरत आहे, असे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केले.




लोकमान्य टिळक यांच्या १०६ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित समारंभात राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांना प्रतिष्ठेचा लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार प्रदान केल्यानंतर ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार तथा पुरस्काराचे मानकरी अजित डोभाल, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, मराठी भाषा मंत्री उदय सामंत, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, माजी मंत्री रवींद्र चव्हाण, टिळक स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. रोहित टिळक, डॉ. गीताली टिळक, डॉ. प्रणिती टिळक आदी उपस्थित होते.

अमित शाह म्हणाले, लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्यलढ्याला जनआंदोलनाचे स्वरूप देत सार्वजनिक गणेशोत्सव आणि शिवजयंती उत्सवांच्या माध्यमातून सांस्कृतिक राष्ट्रवादाची भावना जनमानसात रुजविली. 'केसरी' आणि 'द मराठा' या वृत्तपत्रांद्वारे निर्भीड पत्रकारितेचा आदर्श निर्माण केला, तर राष्ट्रीय शिक्षणाच्या माध्यमातून देशभक्त नागरिक घडविण्याचे ऐतिहासिक कार्य केले. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्या कार्याचा गौरव करतांना श्री. शाह म्हणाले, देशाच्या अंतर्गत व बाह्य सुरक्षेला बळकटी देण्यात त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. गुप्तचर यंत्रणेत अनेक आव्हानात्मक मोहिमा यशस्वीपणे पूर्ण करत त्यांनी राष्ट्रसेवेचा आदर्श निर्माण केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताची सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम, आधुनिक आणि निर्णायक बनविण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली असून, राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित अनेक धोरणात्मक निर्णयांच्या अंमलबजावणीत त्यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले आहे. लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कारासाठी त्यांची झालेली निवड अत्यंत योग्य असून त्यांच्या कार्यातून देशातील तरुणांना राष्ट्रसेवेची प्रेरणा मिळेल, असा विश्वासही शाह यांनी व्यक्त केला.

**राष्ट्रसेवा, राष्ट्रवाद आणि समर्पणाचा गौरव-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कारासाठी अजित डोवाल यांची झालेली निवड ही राष्ट्रसेवा, राष्ट्रवाद आणि समर्पणाचा गौरव आहे. २०१४ पासून राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार म्हणून त्यांनी भारताच्या सुरक्षा धोरणाला नवे परिमाण दिले. त्यांच्या 'प्रोॲक्टिव्ह डिटरन्स' च्या संकल्पनेमुळे भारताची सुरक्षा रणनीती अधिक प्रभावी झाली आहे. भारत आता केवळ हल्ले सहन करणारा देश नसून आवश्यकतेनुसार ठोस प्रत्युत्तर देण्याची क्षमता असलेले सामर्थ्यवान राष्ट्र बनल्याचे त्यांनी नमूद केले.

लोकमान्य टिळकांनी १८५७ नंतर भारतीय समाजात स्वातंत्र्याची जाज्वल्य भावना चेतवून राष्ट्रवादाला नवी दिशा दिली, ते भारतीय राष्ट्रवादाचे जनक होते. टिळकांनी इंग्रजी साम्राज्याच्या काळात भारतीयांची मानसिकता बदलत त्यांच्या मनात देशभक्तीच्या भावनेचे रोपण केले. सार्वजनिक गणेशोत्सव आणि शिवजयंतीच्या माध्यमातून समाजाला एकत्र आणत राष्ट्रीय एकात्मता बळकट करण्याचे कार्य त्यांनी केले. राष्ट्रहितासाठी आयुष्य समर्पित करणाऱ्या व्यक्तीलाच लोकमान्य टिळक यांच्या नावाचा पुरस्कार मिळणे उचित असून अजित डोवाल हे त्या परंपरेला साजेसे व्यक्तिमत्त्व असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

**युवकांनी समर्पण, त्याग आणि कर्तव्यभावनेने विकसित भारताच्या उभारणीत सहभागी व्हावे-अजित डोवाल**

पुरस्कार स्वीकारल्यानंतर राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी लोकमान्य टिळकांचे राष्ट्रवाद, स्वातंत्र्य, समाजजागृती आणि विचारप्रबोधनाचे कार्य आजही तितकेच प्रेरणादायी असल्याचे सांगितले. हा पुरस्कार स्वीकारणे हा आपल्या आयुष्यातील मोठा सन्मान असल्याची भावना व्यक्त करत त्यांनी विकसित, आत्मनिर्भर आणि शक्तिशाली भारताच्या निर्मितीसाठी लोकमान्यांच्या विचारांचे अनुकरण करण्याचे आवाहन केले.

स्वातंत्र्य ही सहज मिळालेली देणगी नसून असंख्य स्वातंत्र्यसैनिकांच्या त्याग आणि बलिदानातून प्राप्त झालेली अमूल्य संपत्ती असल्याचे सांगत त्यांनी स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे हा संदेश आजच्या काळात विकसित भारताच्या राष्ट्रीय संकल्पात रूपांतरित करण्याची गरज व्यक्त केली. राष्ट्रहित हे सर्वांत सर्वोच्च मानून प्रत्येक नागरिकाने राष्ट्रनिर्माणात योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

युवकांनी लोकमान्य टिळकांचे विचार आणि 'गीतारहस्य'चा अभ्यास करून समर्पण, त्याग आणि कर्तव्यभावनेने विकसित भारताच्या उभारणीत सहभागी व्हावे, असेही त्यांनी सांगितले.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लोकमान्य टिळकांनी दिलेला स्वराज्याचा विचार आज राष्ट्रीय सुरक्षेच्या बळकटीत अधिक प्रभावीपणे प्रतिबिंबित होत असल्याचे सांगितले. देशाच्या सीमा, अंतर्गत सुरक्षा आणि गुप्तचर व्यवस्थेला जागतिक स्तरावर नवी ओळख मिळवून देण्यात अजित डोवाल यांचे योगदान अतुलनीय असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यांना मिळालेला पुरस्कार देशाच्या सुरक्षा यंत्रणा, सशस्त्र दल आणि राष्ट्रसेवेला वाहिलेल्या प्रत्येक व्यक्तीचा सन्मान असल्याचे श्री. शिंदे म्हणाले.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्काराची गौरवशाली परंपरा राष्ट्रभक्ती, साहस, दूरदृष्टी आणि कर्तव्यनिष्ठेचा गौरव करणारी असल्याचे सांगितले. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांना प्रदान करण्यात आलेला हा पुरस्कार केवळ एका व्यक्तीचा नसून देशाच्या राष्ट्रीय सुरक्षेचाही सन्मान असल्याचे त्यांनी नमूद केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने जागतिक स्तरावर वेगळी ओळख निर्माण केली असून गृहमंत्री अमित शाह आणि अजित डोवाल यांच्या योगदानामुळे देशाची अंतर्गत सुरक्षा, सीमासुरक्षा आणि दहशतवादविरोधी यंत्रणा अधिक सक्षम झाली आहे. भारतीय पोलीस सेवा, गुप्तचर व्यवस्था आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार म्हणून विविध आव्हानात्मक परिस्थितीत प्रभावी नेतृत्व करत अजित डोवाल यांनी राष्ट्रसेवेत दिलेले योगदान देशासाठी प्रेरणादायी असल्याचेही त्यांनी सांगितले.डॉ. रोहित टिळक यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. १९८६ मध्ये लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्काराला सुरुवात करण्यात आली असून राजकीय, सामाजिक, आर्थिक अशा विविध क्षेत्रातील व्यक्तींना त्यांच्या कार्यासाठी हा पुरस्कार देण्यात येतो. श्री. डोवाल यांना देशाच्या सुरक्षिततेसाठी केलेल्या बहुमूल्य योगदानासाठी हा पुरस्कार देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांच्या ताफ्यासाठी वीजपुरवठा सुरू!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**पाथर्डी :** शुक्रवारी रात्री आठ साडेआठ ची वेळ... शहरातील वीजपुरवठा अचानक खंडित होतो... मराठवाड्यातील दौरा पूर्ण करत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या वाहनांचा ताफा पाथर्डी मार्गे बारामतीला जात होता... राजशिष्टाचार पाळत ताफ्यातील पंधरा-वीस वाहने सायरन वाजवत सुसाट वेगाने शहरातून निघाली... पोळा मारुती परिसरातून पंचायत समिती कार्यालयापर्यंत चाफा पोहोचला... काही क्षणातच वीजपुरवठा सुरू झाला. गायब झालेली वीज अचानक प्रगट झाल्याने उपमुख्यमंत्र्यांनी पाथर्डी मार्गे त्या पालकमंत्री असलेल्या बीड जिल्ह्यातील दौरे केल्यास विजेच्या लपंडावाची समस्या काही प्रमाणात सुटेल अशी उपहासात्मक प्रतिक्रिया व्यावसायिकांनी दिली.

विजेचा लपंडाव, भारनियमन, तांत्रिक बिघाड, असे प्रश्न वीज ग्राहकांना नित्याचे झाले आहेत. मात्र अंधारातून वाट काढत बारामतीकडे निघालेल्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या वाहनांचा ताफा शहरातून जात असताना अचानक बंद झालेला वीजपुरवठा तेवढ्याच अचानक पणे तात्काळ सुरू झाला. प्रश्न योगायोगाचा असेल किंवा यंत्रणेतील समन्वयकाकडून वीजपुरवठा बाबत अधिकाऱ्यांचे तात्काळ लक्ष वेधण्यात आले असेल, प्रकार काही असलं तरी, एरवी एवढ्या चटकन पुन्हा सुरळीत न होणारा वीजपुरवठा अवघ्या काही सेकंदात सुरू होऊन पथदिव्यांचा लखलखाट उपमुख्यमंत्र्यांनाही अनुभवता आला.

पाथर्डी शहर म्हणजे बारामती आहे की काय अशी पुसपसटशी शंका सुद्धा गाडीतून गाव न्याहाळताना उपमुख्यमंत्र्यांना आली असेल. सायंकाळच्या वेळी सर्वत्र वाहन चालकांची घाईगडबड असते. चौका चौकात विशेषतः बाजार समिती पासून जिल्हा बँक चौकापर्यंत व तिथून नाईक चौकापर्यंतचा परिसर राष्ट्रीय महामार्गावर रस्त्याच्या दोन्ही बाजूला वाहने पार्किंग केली जात असल्याने वाहनचालकांना कसरत करीत वाहने चालवावी लागतात. पोलिसांनाही या दोनच चौकातील वाहतूक कोंडी व नियमबाह्य पार्किंगच्या वाहनांना हटवण्यासाठी मोठी कसरत करावी लागते. वरिष्ठांकडून उपमुख्यमंत्र्यांच्या ताफ्याविषयी संदेश मिळताच सर्व चौकांमध्ये वाहतूक पोलीस सज्ज झाले. रस्ता मोकळा करत मंत्र्यांच्या ताफ्याची प्रतीक्षा करू लागले. अचानक वीज गायब झाल्याने सर्वत्र अंधार पसरून पुन्हा वाहतूक कोंडी होण्याची भीती निर्माण झाली. दुचाकी वर फिरून पोलिसांनी रस्ता मोकळा केला खरा, पण अंधार असल्याने एखाद्या खेड्याप्रमाणे शहराची विशेषतः राजमार्गाची अवस्था झाली. तातडीने वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी सूत्रे विद्युत वेगाने हलली. पहिल्या चौकतून शेवटच्या चौकापर्यंत वाहनांचा ताफा पोहोचण्या अगोदरच वीज पुरवठा सुरू झाला. अचानक गाव प्रकट व्हावे अशा पद्धतीने गाव दिसू लागल्याने क्षणभर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या सुद्धा अचंबित झाल्या असाव्यात. विजेच्या लपंडावाने वीज ग्राहक त्रस्त असून वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर तो सुरळीत कधी होणार आहे, अशी चौकशी करण्यासाठी ग्राहकांनी केलेला फोन संबंधितांकडून उचलला गेला तर विजेचा धक्का लागावा अशा पद्धतीचे हावभाव ग्राहकाच्या चेहऱ्यावर झळकतात. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री आहेत.

# राष्ट्रीय महामार्ग ५४८-डी शासकीय जागेतील अतिक्रमणे हटविण्याचा निर्णय

## महसुल, महामार्ग, नगरपरिषद, पोलीस प्रशासन व सर्वपक्षीय प्रतिनिधींच्या बैठकीत एकमत

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** गेल्या चार वर्षांपासून रखडलेल्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८-डीच्या कामाला गती देण्यासाठी प्रशासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. राष्ट्रीय महामार्गालगतच्या शासकीय भूखंडांवरील अतिक्रमणे नियमानुसार हटविण्याचा निर्णय महसूल, राष्ट्रीय महामार्ग विभाग, नगरपरिषद, पोलीस प्रशासन, आंदोलनकर्ते आणि सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी यांच्या संयुक्त बैठकीत घेण्यात आला.

महामार्गाच्या कामामध्ये शासकीय जागेवरील अतिक्रमण हा मोठा अडथळा ठरत असल्याने भूमी अभिलेख विभागाच्या मोजणीनुसार शासकीय जागा निश्चित झाल्याप्रमाणे अतिक्रमण हटविण्याची कारवाई केली जाणार आहे. कारवाईदरम्यान कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासन आवश्यक सहकार्य करणार असून, सर्व विभागांनी समन्वयाने काम करून महामार्गाचे रखडलेले काम तातडीने मार्गी लावण्याचा निर्धार व्यक्त केला.

यापूर्वी अतिक्रमणधारकांना नोटिसा बजावल्यानंतर काही जणांनी त्या नोटिसांविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. मात्र, खोटी माहिती सादर केल्याचे निदर्शनास आल्याने उच्च न्यायालयाने संबंधित याचिका निकाली काढत १० पयाचिकाकर्त्यांवर प्रत्येकी ५० हजारांचा दंड ठोठावला होता. त्यामुळे अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईचा मार्ग मोकळा झाला आहे. बैठकीस नितीन पाटील, ज्योती शिंदे, धनंजय बांगर, अजय साळवे, दशरथ चौधरी, प्रांजल चिंतामणी, पोपटनाना राळेभात, अझहर काझी, अवधूत पवार, प्रदीप टापरे, युवक राहुल उगले, अमित चिंतामणी, नगरसेवक पवन राळेभात, मनोज कुलकर्णी, विकी घायतडक, मोहन पवार, प्रवीण होळकर, आश्रू शेळके यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. अतिक्रमण हटविल्यानंतर रस्त्याचे उर्वरित काम वेगाने पूर्ण करण्यासाठी संबंधित विभागांकडून कार्यवाही करण्यात येणार आहे.

## द • ख • ल



### इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत मृणाल गोरे प्रथम जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड

**माहिजळगाव :** लोकशिक्षिका स्व. लीलाताई दिवेकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सोलापूर आणि यशकल्याणी सेवाभावी संस्था, करमाळा यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी, उर्दू व कन्नड माध्यमाच्या शाळांतील विद्यार्थ्यांसाठी तालुकास्तरीय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत त्रिमूर्ती विद्यालय, टाकळी (रा.), ता. करमाळा येथील इयत्ता आठवीची विद्यार्थिनी कु. मृणाल महावीर गोरे हिने आपल्या प्रभावी इंग्रजी वक्तृत्व कौशल्याच्या बळावर प्रथम क्रमांक पटकावला. या उल्लेखनीय यशामुळे तिची जिल्हास्तरीय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या यशाबद्दल स्पर्धेच्या समारोप प्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते मृणालचा सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, सुवर्णपदक आणि रु. १,००० रोख पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला. मृणालच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल तिच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, पालक, विद्यार्थी तसेच शिक्षणप्रेमींनी तिचे कौतुक करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

### दादापाटील राजळे महाविद्यालयात लो. टिळक, अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन



**पाथर्डी :** तालुक्यातील आदिनाथनगर येथील दादापाटील राजळे कला व विज्ञान महाविद्यालयात लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी व साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती मराठी विभाग,वांङ्मय मंडळ व इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने साजरी करण्यात आली. आदिनाथ कृषी प्रतिष्ठानचे सचिव भास्कर गोरे, प्राचार्य डॉ.राजधर टेमकर यांनी लोकमान्य टिळक आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचा आढावा सांगितला .डावी चळवळ आंदोलनावेळी करंजी येथे स्व.सहकार महर्षी दादापाटील राजळे हे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या सोबत उपस्थित होते. मराठी विभागातील प्रा. डॉ. चंद्रकांत काळे यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनाचरित्राचा थोडक्यात आढावा घेतला. त्यांच्या साहित्यावर प्रकाश टाकला. इतिहास विभाग प्रमुख डॉ.आर.टी. घोलप यांनी लोकमान्य टिळकांचे पत्रकार,गणितज्ञ,संस्कृत पंडित असे विविध पैलू उलगडून त्यांची भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान स्पष्ट केले.तसेच या प्रसंगी प्रा.सोमनाथ चांदणे व प्रथम वर्ष विज्ञान या वर्गातील विद्यार्थ्यांनी अनुष्का शेरकर यांनीही लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्याविषयी मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमास कला विभाग प्रमुख डॉ.एम.एस तांबोळी,कार्यालयीन अधिक्षक विक्रम राजळे, डॉ.साधना म्हस्के,डॉ. निर्मला काकडे,डॉ.जी. बी.लवांडे,डॉ.व्ही.बी. बनसोडे,प्रा. डी.बी. गायकवाड,डॉ.राजकुमार घुले,डॉ.दशरथ दळवे,डॉ. अतुल चौरपगार,डॉ. प्रदीप धनवडे,डॉ.दुर्गा भराट,डॉ.अमोल धाडगे,डॉ.महेश गोरे,प्रा. बळीराम चव्हाण,प्रा. रविंद्र फलके इ. प्राध्यापक ,विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. किशोर कुमार गायकवाड यांनी केले.

# बुगेवाडीत एक कोटी रुपयांच्या विकासकामांचा शुभारंभ



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पारनेर :** पारनेर तालुक्यातील बुगेवाडी येथे सुमारे एक कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार काशिनाथ दाते यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. रस्ते, पायाभूत सुविधा व ग्रामविकासाला चालना देणाऱ्या या विकासकामांमुळे बुगेवाडीच्या सर्वांगीण प्रगतीला नवे बळ मिळणार आहे.

यावेळी आ. काशिनाथ दाते म्हणाले की, विकास हीच आपली राजकारणाची खरी ओळख आहे. गावागावांत मूलभूत सुविधा निर्माण करून नागरिकांचे जीवनमान उंचावणे, प्रत्येक वस्तीपर्यंत दर्जे दार रस्ते, पाणी, वीज आणि आवश्यक सुविधा पोहोचविणे हेच माझे ध्येय आहे. मतदारसंघातील कोणतेही गाव विकासापासून वंचित राहणार नाही. जनतेने दाखविलेल्या विश्वासाला न्याय देत विकासाची ही वाटचाल भविष्यातही अधिक वेगाने सुरू राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या विकासकामांमुळे बुगेवाडीसह परीसरातील दळणवळण अधिक सुलभ होऊन नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून भविष्यातही बुगेवाडीसह संपूर्ण मतदारसंघाच्या विकासासाठी सातत्याने निधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी प्रशांत गायकवाड, वसंतराव चेडे, अशोक चेडे, राजेंद्र औटी, सुनील गाडगे, नवनाथ सोबले, कविता औटी, सखाराम बुगे, रामदास कावरे, विजय कावरे, सुनिता सोबले, कुंडलिक कावरे, साहेबराव बुगे, ठकाराम बुगे, विठ्ठल कावरे, सिताराम बुगे, शिवाजी काळे, रोहीदास भुसारे, मंगेश कावरे, प्रतिभा कावरे, संतोष थोरात, रामदास वाळुंज, सागर वैद्य, सोपान कावरे, कोंडीभाऊ थोरात, शरद कावरे, प्रशांत कावरे, मयुर कावरे, यश बुगे, बाळासाहेब सोनवणे, चिन्मय कावरे, शांताराम तराळ, प्रसाद बुगे, प्रतिक चत्तर, भानुदास कावरे, संपत वारे, गणेश बुगे, सखाराम कावरे, धनाजी थोरात, रामदास थोरात, भाऊसाहेब बुगे, सुनील कावरे, इंजि. प्रताप अंबुले, फारुख शेख, नागेश रोहोकले यांच्यासह अनेक मान्यवर, महिला व ग्रामस्थ पस्थित होते.



# अण्णाभाऊंचे साहित्य प्रेरणादायी ; चव्हाण

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**शहरटाकळी :** अण्णाभाऊ साठे यांनी लिहिलेल्या साहित्यावर अनेक विद्यापीठाकडून प्रबंध प्रसिद्ध झाले, त्यांच्या साहित्यावर केवळ भारतातच नव्हे तर परकीय भाषेत भाषांतर झाली, हजारो वाचकांनी अण्णाभाऊंच्या कथा कादंबऱ्यांची अक्षरश पारायने केली, सर्वसामान्य माणसाविषयी आंतरिक तळमळ व सुखदुःखांचे चित्रन त्यांच्या साहित्यातून होत असून, अण्णाभाऊंच्या साहित्याने अनेकना प्रेरणा दिली असल्याचे प्रतिपादन माजी ग्रामपंचायत सदस्य राजेंद्र चव्हाण यांनी केले. शेवगाव तालुक्यातील शहरटाकळी येथे आणाभाऊ साठे जयंती उत्सव समिती व ग्रामस्थांच्या वतीने साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती मोठ्या उत्साहात संपन्न झाली.

यावेळी ॲड.अनिल मडके, राजेंद्र खंडागळे, आबासाहेब राऊत, राजेंद्र खंडागळे, भगवानराव खरमाळे, भाऊसाहेब मडके, वाय. डी. कोल्हे, मानीयल कोल्हे, संतोष कोल्हे, रामचंद्र गिरम, रविंद्र मडके, देवीदास चव्हान, पंढरीनाथ कोल्हे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले.

# साहित्यरत्न अण्णाभाऊ साठेंना अभिवादन



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**राशीन :** लोकशाहीर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त राशीन शहरात अभूतपूर्व उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. साठे चौक येथे विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने एकत्र येत अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करत त्यांना विनम्र अभिवादन केले. सामाजिक एकात्मता आणि परिवर्तनाच्या विचारांचा जागर कार्यक्रमातून अनुभवायला मिळाला. कार्यक्रमास शाहूराजे राजेभोसले, शंकर देशमुख, विजय नाना मोढळे, पोलीस सहाय्यक उपनिरीक्षक चव्हाण साहेब, भीमराव साळवे, मालोजी राजे भिताडे, डॉ. विलास राऊत, तात्यासाहेब माने, दत्ता आबा गोसावी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी शिवाजी काळे, अशोक जंजिरे, राजेंद्र दावरे, दादा परदेशी, भास्कर मोढळे, सुभाष जाधव, रवींद्र दामोदरे, अमोल जाधव, कुंडलिक सायकर, सोयब काझी, दीपक थोरात, अमोल शेटे, जितेंद्र शेटे यांच्यासह परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी मातंग एकता आंदोलन, राशीन शहराध्यक्ष संतोष ढावरे यांनी उपस्थित मान्यवर, नागरिक आणि आयोजकांचे आभार मानले.



# 'राजमाता जिजाऊ' एसटी बसचे लोकार्पण

## आ. दातेंच्या पाठपुराव्याला यश

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पारनेर :** नगर विधानसभा मतदारसंघातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम आणि प्रवाशांना आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने आ. काशिनाथ दाते सरांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या 'राजमाता जिजाऊ' बससेवेअंतर्गत पारनेर आगाराला मिळालेल्या पाच अत्याधुनिक एसटी बसेसचे लोकार्पण आ. दाते यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

यावेळी बोलताना आ. काशिनाथ दाते म्हणाले, पारनेर आगाराच्या विकासासाठी सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे यापूर्वीही अनेक नवीन बसेस उपलब्ध झाल्या आहेत. आता 'राजमाता जिजाऊ'च्या पाच अत्याधुनिक बसेस पारनेरच्या सेवेत दाखल झाल्याने प्रवाशांना अधिक सुरक्षित, आरामदायी आणि दर्जेदार प्रवासाचा लाभ मिळणार आहे.

# पाथर्डीत उपजिल्हा रुग्णालय परिसरात दुर्गंधी

## तातडीने दुरुस्तीची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**पाथर्डी :** उपजिल्हा रुग्णालय कर्मचारी वसाहतीतील गटार व सेप्टिक टँक तुंबल्याने संपूर्ण परिसरात दुर्गंधी पसरली आहे. आमदार कार्यालय व परिसरातील रहिवाशांना त्रास होत असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. विकास आराखड्यातील या वसाहती मधून जाणारा वीस फुटी रस्ता तातडीने सुरू करावा, यासाठी आ. मोनिका राजळे यांनी पालिकेला आदेश देण्याची आवश्यकता आहे. उपजिल्हा रुग्णालय कर्मचारी वसाहती मधील बहुतेक कर्मचारी निवासस्थाने बंद अवस्थेत आहेत. तुरळक निवस्थानांमध्ये कर्मचारी राहतात त्यांनाही दुर्गंधीचा प्रचंड त्रास होतो. गेल्या अनेक वर्षांमध्ये अशा पद्धतीची कामे झालेली नाहीत.

या इमारतीच्या भिंतीला लागून आ. मोनिका राजळे यांचे संपर्क कार्यालय, असून परिसरापासून हाकेच्या अंतरावर नगराध्यक्षांचे निवासस्थान आहे. शहरातील सर्वाधिक उच्चभ्रू वस्ती म्हणून साईनाथ नगर कडे बघितले जाते. उपजिल्हा रुग्णालयाकडे परिसरातील रहिवाशांनी वेळोवेळी तक्रारी केल्या. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे शासकीय इमारतींची देखभाल व दुरुस्ती असते. गेले अनेक वर्षांपासून या परिसराची देखभाल व दुरुस्ती झालेली नाही. त्यामुळे सर्वत्र काटेरी झुडपांचे गवत, इतर केर कचरा साचला आहे. काही दिवसांपूर्वी वसाहतीतील रिकाम्या बंगल्याच्या आवारा मध्ये चालणाऱ्या नशीखोरांच्या पार्ट्या परिसरातील रहिवाशांनी बंद पाडल्या. या इमारतीच्या मागील बाजूकडील कंपाऊंड पासून वीस फुटी रस्ता प्रस्तावित आहे. बाजार तळावरील खंडोबा मंदिरापासून एडके कॉलनी कडे जाणारा हा रस्ता पूर्ण झाल्यास संपूर्ण वसाहतीतील विविध समस्या कमी होण्यास मदत होईल. राजकीय हस्तक्षेपामुळे हा रस्ता होऊ दिला जात नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. सध्या येथील दुर्गंधीची समस्या तीव्रतेने भेडसावत असून भिंती लगतच्या रहिवाशांना दार खिडक्या सतत बंद ठेवून घरात वावरावे लागते.

आ. मोनिका राजळे यांच्या कार्यालयात दिवसभर गरजूंची वर्दळ असते. येथे येणाऱ्या लोकांना आवारा मधील कंपाऊंडच्या बाजू कडील बाजूने दुर्गंधीचा सामना करावा लागतो. अर्बन बँक इमारतीपासून आमदारांच्या कार्यालयापर्यंतचा हा भाग या समस्येने त्रस्त आहे. गेले अनेक दिवस आवारात ची देखभाल व दुरुस्ती न झाल्याने संरक्षक भिंत सुद्धा धोकादायक बनली आहे. सापांची समस्या सध्याच्या वातावरणात त्रासदायक ठरत असून सर्वच रहिवासी त्रस्त झाले आहेत.

सार्वजनिक बांधकाम विभागाने सेफ्टीक टँक दुरुस्ती व गटारांची स्वच्छता करण्याची लोकांची मागणी आहे. उपजिल्हा रुग्णालयाकडे या कामासाठी आर्थिक तरतूद नसून सर्वच शासकीय इमारतींची देखभाल व दुरुस्ती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून होत असल्याने येथील समस्येकडे सुद्धा गांभीर्याने बघून नागरिकांच्या आरोग्याबाबत योग्य त्या उपाययोजना व्हायला तातडीने पूर्ण करण्याची आवश्यकता आहे.

# २४ तासांत केला रायगव्हाणचा वीजपुरवठा सुरळीत

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री




**श्रीगोंदा :** रायगव्हाण गावातील तब्बल एक महिन्यापासून बंद असलेल्या वीजपुरवठ्याबाबतचे वृत्त प्रसिद्ध होताच महावितरण प्रशासनाला जाग आली. बातमीची दखल घेत महावितरणच्या अधिकाऱ्यांनी अवघ्या २४ तासांत रायगव्हाण गावात भेट देऊन नादुरुस्त डीपीची दुरुस्ती केली आणि गावाचा वीजपुरवठा पुन्हा सुरळीत केला.

गेल्या महिनाभरापासून गाव अंधारात असल्याने नागरिकांना पिण्याच्या पाण्याची टंचाई, मोबाईल चार्जिंगची अडचण, विद्यार्थ्यांच्या अभ्यासात अडथळे, तसेच बिबट्याच्या वावरामुळे सुरक्षेची गंभीर चिंता निर्माण झाली होती. यासंदर्भात ग्रामस्थांनी वारंवार पाठपुरावा करूनही ठोस कारवाई होत नसल्याची नाराजी व्यक्त केली होती.

ही गंभीर समस्या वृत्तातून समोर आल्यानंतर महावितरण प्रशासनाने तातडीने हालचाल करत रायगव्हाण येथे तांत्रिक पथक पाठवले. पथकाने नादुरुस्त डीपीची दुरुस्ती करून वीजपुरवठा पूर्ववत केला. त्यामुळे गेल्या महिनाभरापासून अंधारात असलेल्या गावाला अखेर दिलासा मिळाला असून ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

ग्रामस्थांनी वेळेवर दखल घेत वीजपुरवठा सुरू केल्याबद्दल महावितरण प्रशासनाचे आभार मानले असून, भविष्यात अशा समस्या उद्भवल्यास त्यांचे तातडीने निराकरण करण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. रायगव्हाण गावाचा वीजपुरवठा पुन्हा सुरू झाल्याने पाणीपुरवठा, दैनंदिन कामकाज, विद्यार्थ्यांचा अभ्यास आणि धार्मिक कार्यक्रम पूर्ववत सुरू झाले असून ग्रामस्थांच्या चेहऱ्यावर समाधानाचे वातावरण पाहायला मिळत आहे. यासाठी गावातील सरपंच उपसरपंच ग्रामस्थ यांनी वेळोवेळी महावितरण कडे लेखी पत्राद्वारे पाठपुरावा केला होता.

# अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील हातगाव येथे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०८ वी जयंती ग्रामपंचायत कार्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली आहे.दोन्हीही ठिकाणी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले आहे. यावेळी दिलीप आंबेकर, गोरख कदम, बाळासाहेब सुसे, बंडू हागे, एकनाथ सुसे, दत्तू कनगरे, दत्ता गायकवाड, ब्रम्हानंद मासाळ, संदीप मातंग, चंदू मातंग, संजय मातंग, अशोक मातंग, नंदू साकत, नारायण मातंग, विशाल मातंग, अक्षय मातंग, राहुल मातंग, दीपक मातंग, हरी पवळे, कृष्णा मातंग, संदेश मातंग, रणजीत मातंग, दिलीप मातंग, बन्सी मातंग, किरण मातंग, पूनम मातंग, राजू मातंग, मिठा मातंग यांच्यासह असंख्य सर्व पक्षीय कार्यकर्ते व साठे प्रेमी युवक कार्यकर्ते उपस्थित होते.

# अतिक्रमण हटवा, कर्तव्यदक्ष अधिकारी परत आणा; अन्यथा संघर्ष

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री




**राशीन :** राशीन ग्रामपंचायत कार्यालयाच्या बाहेरील पडवीत आरपीआयचे शहराध्यक्ष नितीन साळवे यांनी सहकाऱ्यांसह आमरण उपोषण सुरू केले असून, ग्रामपंचायतीच्या कारभाराविरोधात संतप्त आंदोलन छेडण्यात आले आहे. अतिक्रमणाचा प्रश्न, ग्रामविकास अधिकाऱ्यांची बदली, सार्वजनिक जागेचा विकास आणि दलित वस्तीच्या निकषांची चौकशी या प्रमुख मागण्यांसाठी हे उपोषण सुरू करण्यात आले आहे.

या आंदोलनाला प्रा. विजयकुमार बळवंत साळवे, वंचित बहुजन आघाडीचे भारत विश्वनाथ साळवे, सचिन मोहन आढाव, कमलेश साळवे, युक्रांतचे कार्यकर्ते रुद्र राऊत, अमर साळवे तसेच आढाव यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून जाहीर पाठिंबा दिला. त्यामुळे आंदोलनाला सामाजिक आणि राजकीय स्तरावर बळ मिळाल्याचे चित्र आहे.

उपोषणकर्त्यांनी प्रशासनावर गंभीर प्रश्न उपस्थित करत, गट क्रमांक १४७६ व १४७७ मधील कथित अतिक्रमणे न्यायालयीन प्रक्रियेचे पालन करून आणि कोणाच्याही राजकीय वा अन्य दबावाला बळी न पडता हटवावीत, अशी ठाम मागणी केली आहे.

याचबरोबर, कर्तव्यदक्ष ग्रामविकास अधिकारी रोहिदास कापरे यांची बदली तात्काळ रद्द करून त्यांना पुन्हा राशीन ग्रामपंचायतीत कार्यरत करावे, अशीही प्रमुख मागणी आंदोलनकर्ते नितीन साळवे व आंदोलनकर्त्यांनी केली आहे.

# दैनिक राष्ट्र सह्याद्री

रविवार दि.२ ऑगस्ट २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८


## एकाचा गळफास घेऊन मृत्यू

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**टाकळीभान** : श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथील एका तरुणाची छपराच्या छताला गळफास घेऊन आत्महत्या. याबाबत सविस्तर माहिती अशी की, जॉन प्रभाकर रणनवरे वय ४० वर्ष हा तरुण परिसरात गट नंबर ९५ मध्ये छपराच्या घरात आपल्या कुटुंबासमवेत राहत होता. दुपारी दोन अडीचच्या दरम्यान आपल्या घराच्या राहत्या छपराला घरी कोणी नसताना दोरी बांधून गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. त्याच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन भाऊ व आई वडील असा परिवार असून मायकल रणनवरे यांचे ते लहान बंधू होत. जॉन रणनवरे यांचे आत्महत्येचे कारण मात्र समजू शकले नाही पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सतीश डवले करीत आहे.

## उपवर्गीकरणाविरोधात ९ ऑगस्टला अहिल्यानगरात महामोर्चा

### संविधानिक हक्कांच्या संरक्षणासाठी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : अनुसूचित जातींमधील उपवर्गीकरणाच्या निर्णयाविरोधात ९ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयावर जिल्हास्तरीय महामोर्चा काढण्यात येणार असल्याची घोषणा जिल्हा उपवर्गीकरण विरोधी कृती समितीने केली.

श्रीरामपूर येथे आयोजित पत्रकार परिषदेत ही माहिती देण्यात आली. ज्येष्ठ नेते अशोक गायकवाड, माजी आमदार भाऊसाहेब कांबळे, रिपाईचे जिल्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात, सुभाष त्रिभुवन, सुरेश बनसोडे, सुभेध गायकवाड, विजयराव भांबळ, अजय साळवे, सुनील क्षेत्रे, भीमशक्तीचे जिल्हाध्यक्ष संदीप मगर यांच्यासह विविध पक्ष संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी ही पत्रकार परिषद घेतली. यावेळी समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले




की, भारतीय राज्यघटनेने अनुसूचित जातींना दिलेले घटनात्मक संरक्षण अबाधित राहणे आवश्यक आहे.

उपवर्गीकरणाचा निर्णय समाजात फूट पाडणारा असून, संविधानाच्या मूलभूत तत्त्वांशी विसंगत असल्याचा दावा त्यांनी केला. त्यामुळे राज्य शासनाने हा निर्णय तातडीने मागे घ्यावा, अशी मागणी करण्यात आली. या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर शांततापूर्ण व लोकशाही मार्गाने महामोर्चा काढण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. संविधानिक हक्कांच्या संरक्षणासाठी जिल्ह्यातील सर्व समाजबांधव, सामाजिक संघटना, आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते तसेच युवक-युवती यांनी मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन कृती समितीच्या वतीने करण्यात आले. विशाल गायकवाड, महेश भोसले, अमित काळे, सिद्धार्थ आढाव, कौशल गायकवाड, शैलेश्वर पवार, पै. दया राजमिये, हर्षल कांबळे, सुनील शिरसाठ, राजू मगर, चरण त्रिभुवन, राजुनाना गायकवाड, संतोष मोकळ यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

महामोर्चाच्या माध्यमातून शासनाकडे अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाचा निर्णय रद्द करण्याची मागणी करण्यात येणार असल्याचे कृती समितीने स्पष्ट केले.

## गुरुपौर्णिमा उत्सवात साईंच्या झोळीत भरभरून दान

### मागच्या वर्षीच्या तुलनेत १ कोटी ८१ लाखांची वाढ

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**शिर्डी** : साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या वतीने बुधवार दि. २८ जुलै ते शुक्रवार दि. ३० जुलै या कालावधीत आयोजित केलेल्या श्री गुरूपौर्णिमा उत्सवामध्ये रुपये ०७ कोटी ८१ लाख १३ हजार ३७७ इतकी देणगी प्राप्त झाली. अशी माहिती संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी दिली.

सदर देणगी मध्ये रोख स्वरुपात रुपये ०२ कोटी ०४ लाख ३५ हजार ५५७ दक्षिणा पेटीत प्राप्त झाले असून, देणगी काऊंटरवर ०१ कोटी २५ लाख ४७ हजार ९३५ रुपये, पी.आर. ओ.देणगी ८७ लाख १४ हजार, डेबीट क्रेडीट कार्ड, ऑनलाईन देणगी, चेक डी.डी.देणगी, मनी ऑर्डर असे एकूण ०२ कोटी ०७ लाख ८४ हजार ७०१ रुपये, परकीय चलनाद्वारे ०५ लाख ६५ हजार ९९१ रुपये, सोने १,१२५.५७० ग्रॅम प्राप्त झाले असून त्याचे मुल्य रक्कम रुपये ०१ कोटी ४६ लाख ७४ हजार ५४४ व चांदी २,३७६.५०० ग्रॅम प्राप्त झाली असून तीचे मुल्य रक्कम रुपये ०३ लाख, ९० हजार ६४९ असे आहे. श्री गुरूपौर्णिमा उत्सव कालावधीत साधारणतः ०३ लाखाहून अधिक साईभक्तांनी साईदर्शनाचा लाभ घेतला.

उत्सव कालावधीमध्ये श्री साईप्रसादालयाद्वारे सुमारे ०१ लाख ९४ हजार २८५ साईभक्तांनी प्रसाद भोजनाचा तर ३९,६११ अन्नप्रसाद पाकिटांचा लाभ घेतला. दर्शन रांगेत ०१ लाख ६५ हजार २०० साईभक्तांना मोफत बुंदी प्रसाद पाकीटांचे वाटप करण्यात आले. या कालावधीत ७१ लाख ०७ हजार ३६० रूपये सशुल्क प्रसादरुपी लाडू पाकीटांच्या माध्यमातून प्राप्त झाले.

उत्सव काळात हजारो साईभक्तांनी संस्थानच्या साईप्रसाद निवासस्थान, साईबाबा भक्त निवासस्थान, व्दारावती निवासस्थान, साई आश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा आदी ठिकाणांबरोबर अतिरिक्त निवास व्यवस्थेकरीता उभारण्यात आलेल्या मंडपात निवास व्यवस्थेचा लाभ घेतला. तसेच साईधर्मशाळा येथे विविध भागातून आलेल्या ३९ पालख्यांमधील पदयात्री साईभक्तांनी निवास व्यवस्थेचा लाभ घेतला.

## शनिशिंगणापूर देवस्थानच्या पाच वर्षांच्या कारभाराचे फॉरेन्सिक ऑडिट सुरू

### माजी विश्वस्तांच्या अडचणी वाढण्याची शक्यता

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सोनई** : श्री क्षेत्र शनिशिंगणापूर देवस्थान ट्रस्टच्या सन १ जानेवारी २०२० ते २०२५ या पाच वर्षांच्या आर्थिक व प्रशासकीय कारभाराचे फॉरेन्सिक ऑडिट सुरू करण्यात आले असून, या कालावधीतील आर्थिक व्यवहार, प्रशासकीय निर्णय आणि नोंदींची सखोल तपासणी केली जाणार आहे. या प्रक्रियेत गैरव्यवहार आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाईची शक्यता व्यक्त केली जात आहे. देवस्थानचे कार्यकारी अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी अतुल चोरमारे यांनी फॉरेन्सिक ऑडिट सुरू झाल्याची माहिती दिली.

आर्थिक फसवणूक, भ्रष्टाचार किंवा गैरव्यवहार उघडकीस आणण्यासाठी पुराव्यासह करण्यात येणाऱ्या या लेखापरीक्षणासाठी मुंबईस्थित सनदी लेखापाल संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे. यासाठी देवस्थानने निविदा प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर राज्य शासनाच्या न्याय व विधी विभागाची मंजुरी घेतली. संबंधित कालावधीत देवस्थानचा कारभार विश्वस्त मंडळाकडे होता. या कारभाराबाबत राज्य शासनाने केलेल्या चौकशीत अनेक अनियमितता आढळल्याचा उल्लेख मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वी विधिमंडळात केला होता. त्यानंतर २२ सप्टेंबर २०२५ रोजी विश्वस्त मंडळ बरखास्त करून नाशिक विभागीय आयुक्तांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली. पूजा पमधील कथित आर्थिक गैरव्यवहार, देवस्थानच्या निधीच्या व्यवहारांतील अनियमितता तसेच कर्मचाऱ्यांच्या भरती प्रक्रियेबाबतही विविध तक्रारी समोर आल्या होत्या. या प्रकरणात पोलिसांनी गुन्हा दाखल करून दोन जणांना अटक केली होती.

सध्या ते जामिनावर आहेत. दरम्यान, याचिकाकर्ते सचिन प्रभाकर दरंदले यांनी उच्च न्यायालयातील जनहित याचिकेनंतर शासनाला आठ आठवड्यांत कारवाईचे निर्देश मिळाल्यामुळे फॉरेन्सिक ऑडिट सुरू झाल्याचे समाधान व्यक्त केले. मात्र, मागील दहा वर्षांच्या कारभाराचेही लेखापरीक्षण व्हावे, तसेच संपूर्ण प्रकरणाचा ईडी व सीबीआयमार्फत तपास होईपर्यंत लढा सुरू ठेवणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

## ९ ऑगस्टला नाशिक-पुणे रेल्वेसाठी 'चक्काजाम' आंदोलन : आ.तांबे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**संगमनेर** : नाशिक-पुणे सरळ रेल्वे मार्गाच्या मागणीसाठीचा लढा आता अधिक तीव्र होणार असून, आगामी ९ ऑगस्ट रोजी (क्रांती दिन) सकाळी ९ वाजता नाशिक-पुणे महामार्गावरील विविध ठिकाणी एकाच वेळी 'चक्काजाम' जनआंदोलन करण्यात येणार असल्याची घोषणा आमदार सत्यजीत तांबे यांनी केली आहेत.

केंद्र सरकारचे या महत्त्वपूर्ण प्रकल्पाकडे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन पुकारण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आमदार तांबे म्हणाले, नाशिक-पुणे सरळ रेल्वे हा कोणत्याही एका पक्षाचा किंवा नेत्याचा विषय नसून सामान्य नागरिकांच्या भविष्यासाठीचा लढा आहे. रेल्वेसारखे मोठे प्रकल्प शतकातून एकदाच उभे राहतात, आणि आज जर ही संधी हुकली तर पुढील अनेक पिढ्यांना त्याची मोठी किंमत मोजावी लागेल.

सध्या वाहतूक कोंडी, रस्त्यांची दुरवस्था आणि अपघातांमुळे दोन-तीन तासांचा प्रवास सहा ते सात तासांपर्यंत लांबत असून विद्यार्थी, नोकरदार, उद्योजक व व्यावसायिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे या सरळ रेल्वे मार्गाची गरज तीव्र बनली आहे.

या रेल्वेमार्गामुळे सिन्नर, संगमनेर, अकोले, नारायणगाव, मंचर, राजगुरूनगर आणि चाकण परिसराच्या विकासाला नवी गती मिळेल, तसेच पुणे व नाशिक शहरांवरील वाहतुकीचा ताण मोठ्या प्रमाणावर कमी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ९ ऑगस्ट रोजी चाकण, राजगुरूनगर, मंचर, नारायणगाव, आळेफाटा, घारगाव, संगमनेर, सिन्नर आणि नाशिक येथे एकाच वेळी हे चक्काजाम आंदोलन होईल.

सरकारला जागे करण्यासाठी जनतेने मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले पाहिजे. इतिहास साक्षी आहे की, जनता एकजूट झाली की सरकारला निर्णय घ्यावाच लागतो, असे आवाहन आमदार तांबे यांनी केले.

## आमदार विठ्ठल लंघे शनि देवाच्या चरणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**सोनई** : आमदार श्री विठ्ठलराव लंघे यांनी काल श्री क्षेत्र शनी शिंगणापूर येथे श्री शनिदेवांच्या चरणी मनोभावे दर्शन घेऊन सर्व जनतेच्या सुख-समृद्धी, उत्तम आरोग्य आणि सर्वांगीण कल्याणासाठी प्रार्थना केली. यावेळी भाजप जिल्हा उपाध्यक्ष श्री. सचिन भाऊ देसरडा, सरपंच भरत बेल्हेकर, मा. सरपंच राजेंद्र बोरुडे, राज्य पोलीस पाटील संघटनेचे सदस्य ड. सयाराम बानकर, विजय आव्हाड, रमेश डोळे, स्वीय सहाय्यक विजय पवार तसेच शिंगणापूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक धनवटे उपस्थित होते. श्री शनिदेवांच्या कृपेने प्रत्येकाच्या जीवनात सुख, शांती, समृद्धी आणि मंगलमय भवितव्य नांदो, हीच आ. विठ्ठलराव लंघे पाटील यांनी श्रीचरणी प्रार्थना केली.

## श्रीगोंद्यात पुन्हा गुटखा माफियांवर एलसीबीचा छापा

### ३६ हजारांचा प्रतिबंधित पानमसाला जप्त, आरोपी फरार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**श्रीगोंदा** : श्रीगोंदा शहरात प्रतिबंधित गुटखा व सुगंधित तंबाखूची विक्री सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेने मध्यरात्री कारवाई करत ३६ हजार ८२८ रुपयांचा प्रतिबंधित पानमसाला व तंबाखूचा साठा जप्त केला. मात्र, छाप्याची चाहूल लागताच संशयित आरोपी घटनास्थळावरून पसार झाला. पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे श्रीगोंदा तालुक्यात गुटखा मावा माफियांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. याप्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेले सविस्तर माहिती अशी की, श्रीगोंदा शहर व परिसरात चोरट्या मार्गाने प्रतिबंधित पान मसाला गुटखा याची विक्री केली जात असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाला गुप्त बातमीदारामार्फत समजली त्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने ३१ जुलै रोजी पहाटे १२.४५ वाजण्याच्या सुमारास श्रीगोंदा बसस्थानकासमोरील हॉटेल त्रिमूर्तीलगत असलेल्या बोळातील घरासमोर पोलीस पथक छापा टाकण्यासाठी पोहोचले. यावेळी शुभम कर्डीले (रा. श्रीगोंदा बसस्टँड परिसर) हा महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला गुटखा व सुगंधित तंबाखू विक्रीसाठी बाळगत असल्याचे निदर्शनास आले. मात्र, पोलिसांची चाहूल लागताच तो घटनास्थळावरून पळून गेला. कारवाईदरम्यान पोलिसांनी २१६ पुडे सुगंधित तंबाखू (किंमत ४,७५२ रुपये) आणि १६२ पुडे केसरयुक्त विमल पानमसाला (किंमत ३२,०७६ रुपये) असा एकूण ३६,८२८ रुपयांचा प्रतिबंधित माल जप्त केला. या प्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस कॉन्स्टेबल रोहित मधुकर मिसाळ यांनी दिलेल्या फिर्यादीवरून श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हवालदार आप्पा तरटे करीत आहेत.श्रीगोंदा शहरात प्रतिबंधित गुटखा व तंबाखूची अवैध विक्री थांबविण्यासाठी पोलिसांनी सुरू केलेल्या कारवाईमुळे गुटखा विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली असून फरार आरोपीचा शोध सुरू आहे.

## श्रीरामपूरात 'साखरपुड्याच्या' कार्यक्रमात राडा !

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : तालुक्यातील बेलापूर - श्रीरामपूर रस्त्यावरील गायकवाड वस्तीनजीक असलेल्या 'वृद्धी लॉन्स' येथे एका साखरपुड्याच्या कार्यक्रमात भरदुपारी झालेल्या हाणामारीने मोठी खळबळ उडवली आहे. या अचानक झालेल्या हल्ल्यामुळे समारंभातच आनंद काही क्षणातच तणावात बदलला असून, कार्यक्रमात एकच गोंधळ उडाला. शहरातील बेलापूरच्या गावाच्या हद्दीत रोडवर वृद्धी लॉन्समध्ये एका साखरपुड्याचा कार्यक्रम धुमधडाक्यात सुरू होता.

पाहुणे मंडळी आपापल्या आनंदात मग्न असताना, अचानक काही अज्ञातांच्या टोळक्याने लॉन्समध्ये प्रवेश करून अचानक तोडफोड व हाणामारी सुरू केली. या अनपेक्षित हल्ल्यामुळे उपस्थितांची पळापळ झाली. या राड्यात चक्क वधूचे वडील गंभीर जखमी झाल्याची माहिती मिळत आहेत. तसेच हल्लेखोर टोळक्याने लॉन्सच्या सामानाची मोठ्या प्रमाणावर तोडफोड केल्याची जोरदार चर्चा आहे. हाणामारीचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही.

या सर्व प्रकारामुळे घाबरून गेलेल्या वरमुलाने आणि त्याच्याकडील पाहुण्यांनी घटनास्थळावरून तातडीने धूम ठोकल्याची ही बेलापूर गावात सुरू आहे. घटनेची माहिती मिळताच शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विशाल खैरे यांनी आपल्या पथकासह तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. परिस्थिती नियंत्रणात आणत पोलिसांनी पाहणी केली. याप्रकरणी संबंधितांवर कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू असल्याचे पोलीस निरीक्षक खैरे यांनी सांगितले आहे. या घटनेमुळे श्रीरामपूर तालुक्यात एकच चर्चा रंगली आहे.

## एकलहरे परिसरात बिबट्याचा वावर; शेळी ठार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**श्रीरामपूर** : तालुक्यातील एकलहरे परिसरात पुन्हा एकदा बिबट्याच्या मुक्त संचाराने शेतकऱ्यांमध्ये दहशत निर्माण झाली आहे. (दि. ३०) रोजी गावातील सलीम शेख यांच्या शेळीवर बिबट्याने अचानक हल्ला केला. या हल्ल्यात शेळी गंभीर जखमी झाली असून तिच्यावर सध्या उपचार सुरू केले. मात्र दि. ३१ जुलै रोजी शेळीचा मृत्यू झाला. यापूर्वी याच परिसरात बिबट्याने धुमाकूळ घातला होता. त्यानंतर काही काळ थंडावलेला बिबट्याचा वावर पुन्हा सुरू झाल्याने ग्रामस्थांची चिंता वाढली आहे. घटनेची माहिती मिळताच प्रशासनाला याची कल्पना देण्यात आली आहे. परिसरात बिबट्याचा धोका वाढल्यामुळे प्रशासनाकडून नागरिकांना विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी वनविभागाने तातडीने प्रभावी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात आणि बिबट्याच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवावे, अशी आक्रमक मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. बिबट्या प्रत्यक्ष निदर्शनास आल्यास त्याला घेरण्याचा किंवा हुसकावण्याचा प्रयत्न अजिबात करू नये. सुरक्षित अंतर राखून याची माहिती तात्काळ संबंधित यंत्रणेला द्यावी. घटना एक दिवस उलटून देखील वनविभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले नव्हते.

## शेळी, बोकड चोरणाऱ्या आंतरजिल्हा टोळीचा पर्दाफाश

### १२ गुन्हे उघड, चौघांना अटक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा, संगमनेर आणि नगर तालुक्यांमध्ये शेळ्या व बोकड चोरी करून दहशत माजवणाऱ्या आंतरजिल्हा टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. या कारवाईत चार जणांना अटक करण्यात आली असून १० लाख १३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तपासादरम्यान श्रीगोंद्यासह विविध पोलीस ठाण्यांतील तब्बल १२ शेळीचोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. अहिल्यानगर सह पुणे जिल्ह्यात शेळ्या चोरणाऱ्या टोळीचा पर्दाफाश झाल्याने ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, अहिल्यानगर जिल्ह्यातील ग्रामीण भागात पशुधन चोरीच्या घटनेमध्ये मोठी वाढ झाली होती या गुन्ह्यांचा शोध घेण्याचे आदेश जिल्हा पोलीस प्रमुख मुम्मका सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांना दिले होते.

त्या दृष्टीने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस पथक ग्रामीण भागात पशुधन चोरणाऱ्या चोरट्यांचा माग घेत असताना स्थानिक गन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती समजली की नगर पुणे महामार्गावर संशयित आरोपी येणार आहेत या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने ३१ जुलै रोजी केडगाव बायपास येथे सापळा रचला. यावेळी संशयित टाटा सुमो गोल्ड (एमएच-१२-जेबी-०१७१) वाहन अडवून तपासणी केली असता वाहनात चोरीच्या शेळ्या व बोकड आढळून आले. यावेळी पोलिसांनी चालकाकडे चौकशी केली असा असता त्याने सुरुवातीला उडवा उडवीची उत्तरे दिली मात्र पोलिसांनी त्यांना विश्वासात घेऊन माहिती विचारले असता त्यांनी या चोरीच्या गुन्ह्याची कबुली दिली.

यावेळी पोलीस पथकाने ओमकार सुधाकर परंवार (रा. खडकी, पुणे), शहाबाज सिराज कुरेशी (रा. येरवडा, पुणे), सक्षम विवेक भोर (रा. पिंपरी, पुणे) आणि अरबाज रशीद कुरेशी (रा. येरवडा, पुणे) यांना ताब्यात घेतले . त्यांच्या ताब्यातून दोन मोबाईल, तीन शेळ्या, एक बोकड आणि टाटा सुमो वाहन असा एकूण सुमारे १० लाख १३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. चौकशीत आरोपींनी श्रीगोंदा, संगमनेर, नगर तालुका, घारगाव तसेच पुणे जिल्ह्यातील रांजणगाव एमआयडीसी परिसरात शेळ्या व बोकड चोरी केल्याची कबुली दिली. चोरीतील जनावरे पुण्यातील काही मटन विक्रेत्यांना विकल्याचेही त्यांनी सांगितले. तपासादरम्यान चोरीचा मुद्देमाल खरेदी करणारा इरफान फकिरमहंमद कुरेशी (रा. लोणी काळभोर, पुणे) याच्याकडून शेळ्यांच्या विक्रीतून मिळालेले ५० हजार रुपये जप्त करण्यात आले.

तर फैजल अब्दुल कुरेशी, सिराज अमिर कुरेशी, शाहीद सिराज कुरेशी आणि रझा अब्दुल शेख हे संशयित अद्याप फरार असून त्यांचा शोध सुरू आहे. या कारवाईत संगमनेर तालुका, नगर तालुका, बेलवंडी, घारगाव, श्रीगोंदा आणि रांजणगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यांतील एकूण १२ शेळी चोरीचे गुन्हे उघडकीस आले. त्यामध्ये श्रीगोंदा पोलीस ठाण्यातील गुन्ह्यांचाही समावेश आहे.संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे व त्यांच्या पथकाने केली. आरोपींना संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यात चौकशी कामी अटक करण्यात आली असून त्यांना न्यायालयासमोर हजर करण्यात आले. पुढील तपास संगमनेर तालुका पोलीस करत आहेत. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे पशुधन चोरणारी ही आंतरजिल्हा टोळी असून त्यांच्याकडून इतरही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलीस सूत्रांकडून वर्तविण्यात येत आहे.